# अध्यात्म

# परमामृत

म. ग्रं. सं. ठाणें
ग्र. अ३५११/म
नं. ३७६
१८७६

# [redacted]मृत.

(दुर्बोधशब्दार्थसहित)

हें पुस्तक

त्र्यंबक गणेश म्हस्कर

यांनीं

मुंबई येथें

जगदीश्वर छापखान्यांत

छापिलें.

शके १७९७

सन १८७६

# प्रस्तावना.

आलीकडे कांहीं कांहीं जुने ग्रंथ प्रसिद्धीस येऊं लागले हें पाहून मोठा आनंद होतो. हा व त्याप्रमाणेंच दुसरे स्वदेशहिताचे उद्योग सतत चालले असतां, आर्यांचा उदयकाल अगदीं समीप आला--असें म्हणण्यास काय बरें हरकत आहे? शेवटीं, अशा प्रकारच्या विद्वत्समूहास प्रार्थना आहे कीं, जुन्या ग्रंथाविषयीं आजपावेतों जी तुमची अप्रीति होती, तिचा समूळ त्याग करून त्यास आपले प्रीतिपात्र करा. इतकें झालें असतां भरतभूमिकेवर फार उपकार होतील अस्तु.--:

फार प्राचीनकालीं "श्रीमुकुंदराज" ह्या नामेंकरून एक महा विख्यात कवि होऊन गेला. हा प्राकृत कविमालिकेंतील मुकुटमणि होय. ह्या कविवृंदानेंच मराठी काव्य रचण्याचा असा मजबूत पाया घातला कीं, त्यावर फार वर्णनीय इमारत उठली आहे. ह्या कविराजाविषयीं विशेष माहिती त्याच्या चरित्रांत लिहिली आहे. प्रथमतः प्राकृत भाषेंत 'परमामृत' हा ओवीबद्ध ग्रंथ मुकुंदरायानेंच केला. ह्या योगानें संस्कृतज्ञांच्या हातांतील 'ज्ञानरूपभांडार' बहुतेक आपल्या हातीं आलें आहे. व प्राकृत भाषेस अत्यंत टेंका मिळाला तस्मात् ही गोष्ट मोठी अभिनंदनीय होय.

वरील जगमान्य ग्रंथ ज्या काळीं झाला, त्या वेळच्या व प्रस्तुतच्या मराठी भाषेंत जमीन अस्मानाचें अंतर पडून, फार विलक्षण रूपांतर झालें आहे. त्यामुळें त्यांतील शब्दांचें यथार्थ ज्ञान होण्यास जाणत्या पुरुषांस ही फार प्रयास पडतो मग अज्ञजनांस तो किती पडत असेल ह्याचें अनुमान मर्मज्ञ वाचक करतीलच. ग्रंथ पठण करून त्याचा खरा भावार्थ कळावा, अशाविषयीं भाविक लोक फार उत्कंठित असतात परंतु यथार्थ ज्ञान नसल्यामुळें, त्या बिचाऱ्याची ही इच्छा तृप्त होणें फार कठीण आहे. एकादे समयीं अर्थ विपर्यास होऊन, जिवाचें समाधान कांहीं केल्या होत नाहीं. पहा! ज्ञानाची महति किती आहे ती!! तशीच समाधान ही एक अत्युत्तम वस्तु केवढी सुखकारक आहे!! असो वर दर्शित केलेली अडचण कांहीं अंशीं तरी दूर व्हावी. एतन्निमित्त ह्यांतील दुर्बोध शब्दांचे सुबोध अर्थ लिहून ह्या कृतीस "दुर्बोधशब्दार्थासहित श्रीपरमामृत" असें नामाभिधान दिलें आहे.

"परमामृत" हा ग्रंथ किती योग्य, किती सुरस, व ह्यांत, मानव देहाचीं खरीं कर्तव्यें व पारमार्थिक विषय- हीं किती उत्कृष्ट रीतीनें प्रतिपादलीं आहेत. व तेणें करून जगन्नियंत्याची ओळख करून घेण्याचा मार्ग किती सुलभतेनें सांगितला आहे- इत्यादि गोष्टींविषयीं वर्णन करण्यासही शक्य नाहीं. उत्तम वक्त्याच्या

संभाषणांतील खरी रसिकता प्राप्त होण्यास तें वक्तृत्वच स्वतः ऐकिलें पाहिजे. तद्वतच त्या ग्रंथांतील वरील गुण पाहण्यास-हा ग्रंथच पूर्ण विचारानें वाचला पाहिजे. 'परमामृत' 'विवेकसिंधु' 'ज्ञानेश्वरी' 'दासबोध' इत्यादि अनेक ग्रंथ- लक्ष्यपूर्वक अवलोकन करून, त्यांतील विषयांचें निराभिमानानें मनन केलें असतां; मुख्य 'हिंदु' धर्माचें खरें वर्म कळून-हल्लीं धर्मसंबंधानें चोहोंकडे जी धांदल उडून गेली आहे. तिचा व्यर्थ शीण ही बऱ्याच अंशीं नाश पावेल. ह्यास्तव, स्वदेश हितेच्छु व धर्माभिमानी लोकांनीं अशा सुरस ग्रंथाचें आवश्यमेव मनन करावें. अशी विनयपूर्वक प्रार्थना आहे.

## ह्या ग्रंथाची रचना केली आहे ती अशी-:

१ -: प्रथमारंभी श्रीमुकुंदराज कवीचें प्रेमळ चरित्र.

२ -: पुढें-कवीचा मूळचा साग्र ओवीबद्ध भाग.

३ -: आणि नंतर विल्हेवारीनें दुर्बोध शब्दांचे सुबोध अर्थ.

येणें प्रमाणें आहे. अशा पद्धती पासून बरेंच कार्य घडून यावें. ( नड निघावी ) अशी ग्रंथकर्ते उमेद धरितात.

श्री वेदशास्त्र सं. रा. रा. गोविंद दामोदर शास्त्री परांजपे श्री वे. शा. सं. रा. रा. माटे बोवा ह्यांचे शिष्य- ह्यांनीं ह्या कामीं चांगलें साह्य केलें. ह्या बद्दल आम्हीं त्यांचे आभार मानून अखंड कल्याण चिंतितों.

त्या संबंधानें विद्वज्जनांस हीच प्रार्थना आहे कीं, अशा गहन विषयाच्या कामीं यत्न करण्याचा हा आरंभच आहे. त्या अर्थी ह्यांत बहुत दोष राहिले असतील, ते समजावून देऊन क्षमा करावी.

अर्थ संबंधानें मत भेद पडण्याचा पुष्कळ अंशीं संभव आहे. ह्या करितां कोणी—विषयास अनुसरून सयुक्तिक व योग्य असा न्यूनाधिक प्रकार कळविल्यास फार उपकार होतील. प्रिय बंधु, ह्यांतील गुणदोष कळवून उत्तम साह्य करतील. असें आम्हीं मनापासून इच्छितों.

इष्टहेतु अंशतः तरी सिद्धीस जावा, आणि ह्या उद्योगाचें थोडें बहुत तरी यश यावें. अशी आमची इच्छा आहे. ती परमात्म्याच्या व श्री मुकुंदरायाच्या पूर्ण कृपेनें सुफल होवो. शुभंभवतु.

मुकाम, सासवनें ता॰ अलीबाग जिल्हा कुलाबा मिति माघ शुद्ध १५ शाके १७९७

त्रिंबक गणेश म्हस्कर
सासवनेकर.

## श्री मुकुंदरायाचें चरित्र.

श्री 'मुकुंदराज' ह्यांचा अवतार कशा करितां झाला, त्या विषयींचा वृत्तांत फार चमत्कारिक आहे इतकेंच नव्हे; तर तो अत्यंत चित्तवेधकही होय त्या साठीं तो आ-

मच्या रसिक वाचकांस प्रेमपूर्वक निवेदन करितों.

प्रस्तुतचें मनोरंजक चरित्र लिहिण्यापूर्वी- प्रिय वाचकांस एका गोष्टीविषयीं सुचविणें, आम्हांस अगदीं आवश्यक वाटतें तें हेंच कीं- आम्ही पुढें जो लेख लिहिणार- त्यास आधार म्हटला तर एक दंतकथा व शाकाच्या वगैरे माहिती बद्दल नवनीतादिक ग्रंथ त्यां शिवाय दुसरा कांहीं नाहीं, कारण आपल्या लोकांत पूर्वी इतिहास वगैरे लिहून ठेवण्याचा परिपाठ फारसा नव्हता. ह्यामुळें ह्याविषयीं लेख किंवा दुसरा कांहीं सप्रमाण आधार नाहीं. व कदाचित् कोठें असला, तरी तो मिळण्यास आमच्या पाशीं साधन नाहीं. ह्या करितां वरील आधारानेंच पुढील लेख लिहितों.

पूर्वी म्हणजे- शके ९०० व सन १००० सुमारास 'जयपाळ' ह्या नामेंकरून एक महापराक्रमी राजा या भरत खंडांत होऊन गेला. भक्तजनांचा छल करण्याविषयीं हा भूपाळ फार प्रख्यात होता. त्याचा क्रम असा होता कीं, आपल्या नगरांत, कोणी ईश्वरभजनांत रत असलेला योगीजन प्राप्त झाला म्हणजे- त्यास "ब्रम्हस्वरूप" कसें आहे तें दाखवा. अशी आज्ञा करावयाची. तेव्हां त्यानें त्यास सांगावें कीं, राजा, 'परब्रम्हपद' पहाण्याची तुझी इच्छा आहे ही फार चांगली आहे. पण ह्याक्षणींच तें कसें दृष्टिगोचर होईल? तें पहाण्याचा मार्ग फार लांब व दुर्गम आहे. ज्यानें 'ब्रम्हरूप' पाहिलें. तो झालाच पावन! ह्यास्तव राजा!! कोणा सद्गुरूस अनन्यभावें शरण जाऊन, तूं आपण्यास योग्य करून घ्या-

वें. म्हणजे तुला तें साहजिक प्राप्त होईल. ह्या उत्तरानें राजा न्वें समाधान होईना. भूपानें त्यास कारागृहांत टाकून- नाना प्रकारच्या यातना भोगावयास लावावें. अशा प्रकारें त्यानें ३६० योगीजन दुःखसागरांत लोटून दिलें होतें. अरेरे!! काय मूर्खत्व हें!! अविनाशि, विमल व अखंड सुखदायक असें जें ब्रम्हतेज' तें भगवत् प्रसादाशिवाय कसें बरें प्राप्त होईल!! अस्तु.

अशा प्रकारें- संतजन महत् दुःख भोगीत, ईश्वरास करुणा भाकित होसातों, जगन्नियंत्यास कसें बरें समाधान वाटेल!! 'भक्तनारक' ह्या ब्रिदास तो कलंक लाविल काय? सज्जनांच्या दुःखाची परम सीमा होऊन — त्यांची खरी परीक्षा कळली. त्या वेळीं भगवंतानें त्यांस दुःखविमुक्त करण्याचा विचार करून "मुकुंदराज" ह्या संज्ञेचा मानुष्य देही अवतार धारण केला. तस्मात् परमेश्वराचाच हा अवतार होय. ह्यांचे आईबाप कोण? ह्यांची जन्मभूमिका कोणती? इत्यादि गोष्टींविषयीं सप्रमाण माहिती मिळू शकत नाहीं. हा अयोनि संभवापासून उत्पन्न झाला असावा. असा कित्येक वेदांती लोकांचा अभिप्राय आहे.

कांहीं अल्पकाळपर्यंत बालक्रीडा झाल्यावर— 'मुकुंदरायांनीं' 'जयत्पाळ' रायाच्या पुराप्रत गमन केलें. नगरांत प्रवेश करतात तों आरंभींच एक तलाव खणण्याचें काम संत मंडळीकडून चालविलें आहे. असें अवलोकितांच कविश्रेष्ठास फार कोप आला. तलावावरील प्रिय जनास

स्वसमागमें घेऊन, राउळांत प्रवेश केला. पश्चात् तलाव खणण्याचें वगैरे सर्व काम आपोआप होऊं लागलें. हें पाहून नागरिक लोकांस फार विस्मय वाटला. अहाहा!! परम दयाळू परमात्म्याची काय अद्भुत शक्ति ही!! असो 'मुकुंद' राजाचें दिव्य तेज पाहून राजा अगदीं दिपून गेला.


सिंहासनावर बसवून, पूजाविधि वगैरे आदरातिथ्य झाल्यावर राजानें करयुग्म जोडून 'ब्रम्ह' दाखविण्याविषयीं प्रार्थना केली. समर्थांनीं आनंद प्रदर्शित होय असें उत्तर दिल्यावर- एक उत्तम वारु (सर्वसामानासहित) आणावयास सांगितला. तो आणतांच त्यावर आरोहण होण्यास भूपाळास आज्ञा केली. राजा एक पाय ठेवून दुसरा ठेवणार- तोंच त्या अश्वाच्या पृष्ठभागावर प्रतोदाचा एक तडाका दिला. साक्षात् प्रभूच्याच हातचा सपाटा बसल्यावर- मग काय विचारावें! तो तुरंग अंतराळीं जाऊन आकाश कटाहांत भ्रमण करूं लागला. असें अहोरात्र तीन दिवस पर्यंत होऊन चौथ्या दिवशीं तो मूळ स्थानावर आला, तों राजा अगदीं म्लान वदन होऊन मूर्च्छने प्रत पावला आहे. तें समर्थी, क्षोणिपतीस सावध करून प्रश्न करितात कीं, 'जयपाळा' 'ब्रम्हरूप' पहाण्याची तुझी इच्छा तृप्त झालीना? असें म्हणतांच नृपानें 'मुकुंद' चरणीं माथा ठेवून कृत पापराशींची अनुताप पूर्वक क्षमा मागितली. राजा धायां धायां रुदन करीत आहे- पुनः पुनः

पदीं माथा ठेवून ह्या पातकी दासास 'निर्विकार' तेजीं अखंड ठेवा. अशी विनयतेनें प्रार्थना करीत आहे हें पाहून 'मुकुंद' राजाचा कंठ सद्गदित झाला. तेव्हां आश्वासन देऊन-दहा दिवस पर्यंत परमेश्वर भक्तीचा अत्युत्तम उत्साह केला. सर्व साधुजनांस संतोषित केलें पुढें 'जयपाळ' राजा करितां त्यासच निमित्य कल्पून, सकल जगाचा उद्धार व्हावा एतन्निमित्त "अविनाशी परब्रम्ह पदें प्राप्तीचा मार्ग पुढील ग्रंथ रूपानें कथन केला. ह्या प्रमाणें हें रमणीय कथानक आहे.

दुर्बोधशब्दार्थसहित

# श्रीपरमामृत

प्रारंभः


मुकुंदराज

श्रीगणेशायनमः॥ श्रीसरस्वत्यैनमः॥ श्रीगुरुभ्योनमः॥ ॥न
मोश्रीसद्गुरुनाथा॥ तूंपरममार्गीचादाता॥ कृपासिंधूजीसमर्था॥
अनंताअपारा॥ १॥ तूंआनंदमयस्वयंप्रकाश॥ कैवल्यदातापरमई
श॥ तूंनिजरूपेंअविनाश॥ निराकार॥ २॥ तूंनिःसंगनिरंजन॥ तूंनिरं
तरअभिन्न॥ नाहींतुजसमान॥ कोणीदेवा॥ ३॥ तूंजंवकृपाकरिसी
तंवसंसारबंधनातोडिसी॥ अविद्येपासूनिसोडविसी॥ नारिसीजी
वां॥ ४॥ नहोयजेंदेवांअस्करां॥ तेंतुझेंकरणेंदातारा॥ समर्थनदेखो
दुसरा॥ तुजवांचुनी॥ ५॥ आणिकाकवणानमस्कारूं॥ कवणाचें
स्तवनकरूं॥ जयजयाजीश्रीगुरू॥ अगाधमहिमा॥ ६॥ जेसासर्वप
टांमाजीएकतंतू॥ तैसातूंविश्वींविश्वभरितु॥ सर्वव्यापूनिविरहितु
अलिप्ततूं॥ ७॥ हींअनेकसगुणरूपें॥ तूंधरिसीआपुलेनिव्यापें॥
शिवशक्तीचींसाकाररूपें॥ दाविसीतूं॥ ८॥ तुजविणअन्यनदेखोंको

परः णी ॥ ह्मणोनि आणिका तें न मानी ॥ हा मस्तक तुझिये चरणीं ॥ ठेवि प्र·
१ लासत्य ॥ ९ ॥ तूं शुद्धात्मा स्वयंज्योती ॥ तुझी सर्वत्र ज्ञानदीप्ती ॥ न- १
मो न मो जी श्रीगुरुमूर्ती ॥ आनंदविभो ॥ १० ॥ तूं ब्रह्मारूपें उत्पत्ती क
रिसी ॥ विष्णुरूपें प्रतिपाळिसी ॥ रुद्ररूपें संहारिसी ॥ पुनरपि रचा
वया ॥ ११ ॥ तूं सर्वसाक्षी सर्वज्ञ ॥ तूं सर्वविद्याविद प्राज्ञ ॥ तूं तत्वार्थे
जीव सर्वज्ञ ॥ सर्वेश्वर ॥ १२ ॥ तूं जाणशी स्वरूपासी ॥ ह्मणोनि जा
णीव स्फुरविसी ॥ परमात्मा ह्मणविसी ॥ यया उपाधिस्तव ॥ १३ ॥
तुझिये इच्छेचा विस्तारू ॥ विस्तारलें हें चराचरू ॥ जीव अंश अपारू
स्फुरसी तूंची ॥ १४ ॥ सर्व जीवांची ज्ञप्ती कळा ॥ जगासि जाणे सक
ळा ॥ तो ज्ञानात्मा जिव्हाळा ॥ त्वंपदाचा तूं ॥ १५ ॥ माया अविद्या
संबंधें ॥ जीव ईश्वर होसी भेदें ॥ हाहि आपुले निविनोदें ॥ खेळ तु १
झा ॥ १६ ॥ तूं स्वानंद सदोदित ॥ असि पदीं तदात्मा अलिप्त ॥ पदा

तीनस्वयंभरिना॥ केवल्यतूं॥ १७॥ ऐशीकरितां तुझीतु ती॥ मु
कावल्यावेदश्रुती॥ मगमीप्राकृतकिती॥ वर्णावयायोग्यतुज॥
१८॥ तूंप्रेमभरितपरमपुरुष॥ चतुर्विधवाचेचाईश॥ आतांदेईंदे
वामतिप्रकाश॥ तुजजाणावया॥ १९॥ तूंकृपासिंधूजरिवरदहो-
सी॥ तरिअज्ञानजीवाचेंफेडिसी॥ मगलोपलेंप्रगटविसी॥ शि
वत्वसिद्ध॥ २०॥ ह्मणोनिमीविनवींशरणागत॥ तूंज्ञानसूर्यहृ
दयींउदित॥ तरीअविद्यातमक्षणांत॥ फिटेलस्वामी॥ २१॥ या
वरीश्रीगुरुझालेप्रसन्न॥ करवितीपरमार्थाचेंकथन॥ बोलेनस
कळशास्त्रांचेंमथन॥ निर्वाणतेंची॥ २२॥ इतिश्रीपरमामृते
मुकुंदराजविरचितेमंगलाचरणंनामप्रथमप्रकरणंसंपूर्णम्॥ १

पर २ श्रीगुरुभ्योनमः॥ ॥जेंजाणोनिसर्वकीजे॥जेंसर्वदाअभ्या ग्रं० २
सिजे॥जेथेंपरतोनिचित्तेंराहिजे॥बुडीदेउनी॥१॥तेंअभ्यंतरीं
चेंज्ञान॥प्रगटबोलेनसाधन॥जेथेंशतलेयोगीजन॥निरंतर॥
२॥जैसेंसागरींचेंअमृत॥कांपयमथूनिकाढिजेनवनीत॥तैसें
सारसर्वांत॥तेंचिसांगेन॥३॥नलगेयापरतेंकाहींकरणें॥ना
नापरीचींअभ्यासनें॥संकल्पविकल्पात्मकसाधनें॥सर्वत्यजि
जे॥४॥संकल्पविकल्पात्मकमतें॥नानादर्शनेंकष्टतें॥जंवम-
हावाक्याचेंविवरणचित्तें॥अनुभविलेंनाहीं॥५॥जोंनिरूपा
धिस्वरूप॥अनुभविलेंनाहींआपेआप॥तोंवरीकष्टासिमाप॥
कवणकरी॥६॥व्रततपनियमाचियासांकडीं॥संदेहींगुतलीं
बापुडीं॥तींकेंविपावतीलपैलथडी॥संसारसागराचिये॥७ २
पूजास्नानेंतीर्थेंदानें॥मंत्रयंत्रयोगहवनें॥कीजेतितुकेंफळभो

गणें॥ स्वर्गादिकसर्वथा॥८॥ जपतपअनुष्ठानें॥ आणिनाना
परींचींसाधनें॥ मोक्षनपाविजेआत्मज्ञानें॥ वांचोनियांसर्वथा॥
९॥ जोंवरीजीवेश्वरउपाधी॥ निरसूनिनेणिजेऐक्यसिद्धी॥ भेद
सांडूनिशबलविरोधी॥ शुद्धस्वरूपनप्रकाशे॥ १०॥ त्वंपदतत्प
दींचेंलक्ष॥ शबलसांडोनिपरोक्ष॥ नेणिजेशुद्धअपरोक्ष॥ तंव
वरीमोक्षकैंचा॥ ११॥ जोंवरीनांएकमीएक॥ हानतुटेचिकलं
क॥ जंवनप्रकाशेसम्यक्॥ तंवपरमप्राप्तिनघडे॥ १२॥ जंवव
रीत्रिपदशोधनघडे॥ अर्धमात्रापरतेंनसांपडे॥ क्षराक्षरनिवा-
डानघडे॥ उत्तमपुरुषींसमरस॥ १३॥ सच्चिदानंदविवरण॥
जंवनेणिजेकार्यकारण॥ विवळेनाशुद्धआत्मज्ञान॥ तंवमोक्ष
कैंचा॥ १४॥ सद्गुरुमुखेंवेदांतश्रवण॥ नघडेतयाचेंमनन॥
जंवनपाविजेनिजध्यासन॥ तंववरीमोक्षकैंचा॥ १५॥ सांडूनि

पर- वेदांतसिद्धांत॥ जेकांबोलतीपाखांडमत॥ त्यांचीनायकावीमात प्र-
३ महावाक्यार्थअनुभविजे॥ १६॥ वेदबोलिलासृष्टिक्रम॥ तोसां २
डुनिसकळधर्म॥ वेदांताचेंनिजवर्म॥ लाहिजेगुरुमुखें॥ १७॥
वेदांताचेंअबोलणें॥ सिद्धांतींचेंजाणोनिनेणणें॥ जेथेंमिळणीहो
यतेंपावणें॥ कैवल्यपद॥ १८॥ जीवेश्वराचीमिळणी॥ होयपरम
पदनिर्वाणी॥ तेथेंद्वैतबुद्धिचीकडसणी॥ तुटोनिजाय॥ १९॥ ॥
इतिश्रीपरमामृतेमुकुंदराजविरचितेअन्यमतखंडणंनामद्वितीयप्रकरणंसंपूर्णम्॥ २॥ ॥ छ॥ ॥ छ॥ ॥ छ॥

श्रीगुरुभ्योनमः॥ करूनिआदिराक्रियाअंगिकारू॥ जोकरी
उत्पत्तिस्थितीसंहारू॥ सर्वसाक्षीसर्वेश्वरू॥ ताशबलबोलिजे॥ ३
१॥ स्थूळदृष्टीचेंजाणपणें॥ नितुकेंहिनिरसणें॥ उरेअदृश्यजोद्रष्टे

पणें॥ तोचि शुद्धपरमात्मा॥ २॥ सर्वज्ञआणिसर्वेश्वरु॥ ऐसा स
कळशास्त्रांचानिर्धारु॥ तोचिजाणिजेपरात्परु॥ ज्ञप्तिमात्र॥ ३
अनंतशक्तींचाद्रष्टा॥ स्थानमानविरहितप्रतिष्ठा॥ जयाअपरमि
तघनदाटा॥ पारनेणिजे॥ ४॥ नयाबोलिजे शुद्ध॥ निरसिजेश
बलत्वअशुद्ध॥ ज्ञानघनानंदसिद्ध॥ परमेश्वर॥ ५॥ ब्रह्मांडहि
रण्यगर्भमाया॥ जोवेगळायादेहत्रया॥ मूळप्रकृतीमहामाया
यांविलक्षणजो॥ ६॥ उत्पत्तीस्थितीसंहार॥ सर्वसाक्षित्वाचाव्य
वहार॥ याअवस्थातीतअपार॥ आपेआपजो॥ ७॥ ब्रह्मावि-
ष्णूरुद्र॥ आणिचोथाहासर्वेश्वर॥ यावेगळाअपरंपार॥ शुद्ध
ब्रह्मजो॥ ८॥ याचिपरीपाहतां॥ जीवअविद्याविरहिता॥ का
म्यकर्मातीता॥ जाणिजे ऐसा॥ ९॥ स्थूळसूक्ष्मकारण॥ चोथा
देहमहाकारण॥ जागृतिस्वप्नसुषुप्तीजाण॥ तुरियाचोथी॥ १०

परः ४

विश्वतैजसप्राज्ञ॥ प्रत्यगात्मासर्वज्ञ॥ हेअभिमानीसंज्ञ॥ शब
ल्लत्वंपदार्थी॥ ११॥ याइतुकीयाचाद्रष्टा॥ तोज्ञानघनतयाप्रगटा
शुद्धबोलिजेप्रतिष्ठा॥जीवत्वनिरासें॥ १२॥ शबलतोवाच्यपक्ष
शुद्धबोलिजेलक्ष॥ लक्षीऐक्यजाणीतल्यामोक्ष॥ सिद्धीचिलाभे
॥ १३॥ दोन्हींनयनींएकदृष्टी॥ दोहींश्रवणींएकनादउठी॥ दोहीं
अधरपुटीं॥ एकचिशब्द॥ १४॥ तैसेंदोहींपदींचेंएकविवरण॥ क
रितांजीवेश्वराचेंनिरसन॥ शुद्धलाधेतयाकवण॥ द्वैतकल्पी॥ १५
जैसेंमहदाकाशअखंडपूर्ण॥ घटमठींदिसेभिन्न॥ घटमठाका
शऐसेंजाण॥ बोलतीतया॥ १६॥ तेघटमठदोन्हीभंगतां॥ ठा
यींचेंचिऐक्यतत्वता॥ तैसेंजीवेश्वरउपाधीनिरसतां॥ स्वस्वरू
पएक॥ १७॥ मायाअविद्यानाशी॥ ऐक्यहोयजीवेश्वरासी॥ ऐ ४
सेंबुझोनियांमानसीं॥ स्फुरिवयाहोइजे॥ १८॥ मायाअविद्येसि

प्र. ३

पाहतां॥ विरोधभासेउभयतां॥ ह्मणोनिसबलत्यागेशब्दघेतां अखंडएकरसब्रह्म॥ १९॥ ऐसेंनिमहावाक्यविवरणें॥ त्वंपदत त्पदशोधणें॥ असीपदींपावणें॥ ऐक्यसिद्ध॥ २०॥ ह्मणूनियांदृ ष्टीविण॥ सकळभेदमतेंजाण॥ तेंबोलिजेखंडज्ञान॥ मायिक व्यवहार॥ २१॥ इतिश्रीपरमामृतेमुकुंदराजविरचितेमहावाक्य विवरणंनामतृतीयप्रकरणंसंपूर्णम्॥ ३॥ ॥ छ॥ ॥ छ॥

श्रीगुरुभ्योनमः॥ आतांद्वैतपाहणें॥ तेंदुसरेंकरूनियांजाणणें पुनरपिसुखणें॥ठायिंच्याठायीं॥ १॥ उफराटेंदृष्टिचेंपाहणें॥जे दृष्टीमाजीदृष्टिमुखणें॥ पाहातयामुळासिजाणणें॥ स्वस्वरूपा सी॥ २॥ तेथूनिपरतेंपाहतां॥ नाहींपाहणेंसर्वथा॥ दुमदुमीत

परः ५ अरवंडिता॥ माजीपडिजे॥ ३॥ जेथेंनाहींमायाअविद्या॥जेअप प्र. ४
रिमितस्वसंवेद्या॥ तेसांगोंब्रह्मविद्या॥ सावधानपरियेसा॥ ४॥जे
घनानंदसुरवाचीराशी॥ प्रवेशोनितयेस्वप्रकाशी॥ असिजेगमना
गमनासी॥ नासोनिसदा॥ ५॥ तेंसाधावेंकवणेरीती॥जेणेंहोय
नित्यतृप्ती॥ तेयुक्तिएकावीसुनिश्चिती॥ एकाग्रहोउनी॥ ६॥
परिआधींसांगोंसाधन॥ आत्मस्वरूपाचेंपरिज्ञान॥ तेंजाणितल्या
विण॥ काय ध्यावें॥ ७॥ आधिआत्मयातेंजाणावें॥मगतयातेंसा
धावें॥ येरवीनुसतेंअनुभवावें॥ कायधरुनी॥ ८॥ ज्यायुक्तिस्व
रूपएक॥जाणणेंतेबुद्धिएक॥ मीआहेंहेंतवनिष्टंक॥ जाणसीतूं॥
९॥ असेंतवजाणसी॥ परिमीकोणहेंनेणसी॥ तरीकांआपआप
पांसी॥ बुझेसिना॥ १०॥ तूंकोणकोठूनिकैंचा॥आलागेलासि ५
तरीसाचा॥ परिपालवनधरिसीविचाराचा॥आपणाजाणावया॥

११॥ तूं देह कीं देहाचा जाण॥ देह तुज जाणे कीं तुज याचें ज्ञान॥ पाहतां द्रष्टा तूं आपण॥ देह तुज दृश्य॥ १२॥ देहास बाह्य अभ्यंतरीं॥ तूं जाणशी गा विचारीं॥ देह अलंकाराचे परी॥ मिरविशी तूं॥ १३॥ लेवोनि रवोळी पंचभूतांची॥ भूतीं मिरविशी तूंची॥ जाणीव असे कीं याची॥ तुज चि कीं॥ १४॥ ऐसे आपणि या जाणा॥ निरसीं हा दृश्य गुण॥ जे देह मी ह्मणतां सि आपण॥ ते सांडी भ्रांती॥ १५॥ देहाचिया अवयवां समस्तां॥ तूं चि एक जाणता॥ तो तुझा तूं आइता विचारूनि पाही॥ १६॥ रोम त्वचा नाडी मांस॥ अस्थि हे पंच अंश॥ कठिण हा धरणीचा भास॥ जाणसी तूं॥ १७॥ लाळ मूत्र शोणित॥ मज्जा रेत हें आप द्रवत॥ या पांचा अंशांतें निश्चित॥ जाणता तूं एक॥ १८॥ क्षुधा तृषा आळस निद्रा॥ मैथुन हे अंश वैश्वानरा॥ या पांचांचिया व्यवहारा॥ जाणशी तूं॥ १९॥ चलन धावन निरोधन॥ प्रसर

पर० पाआणिआकुंचन॥ हेचंचळपांचहीगुण॥ वायूचेदेखणातूं॥ २०॥ प्र०
६ कामक्रोधशोकजाण॥ लोभभयहेपांचगुण॥ तेंआकाशाचेलक्ष ४
या॥ देखणातूं॥ २१॥ ऐसेपंचभूतांचेअंश॥ जाणशीपंचवीस॥ ते
सर्वहीतुजदृश्य॥ स्थूलदेहहा॥ २२॥ याचेसाहीविकारजाण॥
जायतेअस्तिविवर्धन॥ विपरिणमतेवार्धक्यसंहरण॥ यासीच
असे॥ २३॥ याचेवर्णव्यक्तिरूपारी॥ जाणसीयाचियानामासी
ह्मणोनितुजआत्मयासी॥ हेविजातीकैंची॥ २४॥ तूंआत्मानिरा
कार॥ जाणसीयादेहाचाआकार॥ जरीकाष्ठींअग्निसाचार॥ त-
रीवेगळाकीं॥ २५॥ तैसातूंयांसिव्यापुनि॥ अससीयास्थूळातें
भरुनी॥ रोमांचआदिआयकरुनी॥ जाणतातूं॥ २६॥ परिहेंतु
जनेणे॥ तूंचिअससीजाणपणें॥ तोतूंआत्माआपण॥ नव्हसी ६
नरनारी॥ २७॥ आत्मयाचेनिजागेपणें॥ बाह्यव्यापारकरणें॥

इंद्रियद्वाराभोगणें॥ विषयाचेंघडे॥ २८॥ मीअमुकानामरूपा
चा॥ ऐसाहाअभिमानविश्वाचा॥ तूंजाणतायासर्वांचा॥ विल
क्षणआत्मा॥ २९॥ इतिश्रीपरमामृतेमुकुंदराजविरचितेस्थूळ
देहनिरसनंनामचतुर्थप्रकरणंसंपूर्णम्॥ ४॥ ॥ छ ॥ ॥

---

श्रीगुरुभ्योनमः॥ तुजश्रवणांतूनिऐकणें॥ त्वचेंतूनिस्पर्शघेणें॥
नयनांतूनिदेखणें॥ नानारूपांतें॥ १॥ जिव्हेंतूनिस्वादघेसी॥
घ्राणांतूनिपरिमळजाणसी॥ वाचेंतूनिउच्चारिसी॥ अक्षरेंसर्व
२॥ करांतूनिदेणेघेणें॥ पायांतूनिचालणें॥ शिश्नांतूनिरति
भोगणें॥ गुदींमळविसर्ग॥ ३॥ याइंद्रियांतूनितूंचिजाण॥ प्र-
काशसीआडळाकोन॥ तोतूंइंद्रियांसिविलक्षण॥ साक्षीरूप॥

परः ७ ४ ॥ श्रवणस्पर्शनदर्शन ॥ स्वादअवघ्रहण ॥ याज्ञानइंद्रियेंकरु प्र· ५
न ॥ सकळपांचहीविषय ॥ ५ ॥ शब्दस्पर्शरूपरसगंध ॥ वचना
दानगमनानंद ॥ मळविसर्गहेपंचविध ॥ कर्मेंद्रियांजाणतातूं ॥ ६
प्राणापानव्यान ॥ उदानआणिसमान ॥ यांचींस्थानेंस्थितीसंपू
र्ण ॥ जाणसीतूंचिएक ॥ ७ ॥ अंतःकरणमनबुद्धी ॥ चित्तअहंका
रयापांचाभेदीं ॥ स्फुरसीजाणसीतूंयाआदी ॥ ठायींचाचिउभा ॥
८ ॥ अंतःकरणींचाआठवस्फुर ॥ वरीउठतीवृत्तिचेउद्गार ॥ तया
सिजाणेतोअक्षर ॥ सिद्धचिअसे ॥ ९ ॥ वृत्तीचेंस्फुरणझालें ॥
तयामागूनिजाणणेंउठिलें ॥ हेंह्मणोनयेपाहिलें ॥ आइतेंचिअसे
१० ॥ अंतःकरणवृत्तीचेंस्फुरण ॥ तेंसंकल्पविकल्पात्मकमन ॥
तेंचिनिश्चयात्मकह्मणोन ॥ बुद्धिह्मणिजे ॥ ११ ॥ निश्चयात्मक ७
जोअर्थु ॥ तेथेंअनुसंधानात्मकहेतु ॥ तेंचित्तहेंजाणतूं ॥ तत्म

घृत्ति तोअहंकारु॥१२॥ ऐसीअंतःकरणपंचकस्फूर्ती॥ तूंजाणसी स्वयंज्योती॥ यालागिस्वसंवेद्यमूर्त्ती॥ आत्मातूंची॥१३॥जैसा कापुसापासूनि निघेदोरा॥ तोचि नयाभासेदुसरा॥ तेसेंमनबुद्धि चित्तअहंकारा॥ होणेंस्वरूपापासुनी॥१४॥ तो पीळुनुकलितां दोरा॥ ह्मणावा परीकापुसरवरा॥ उकलितांनुकलितांदुसरा॥ भासुनाहीं॥१५॥ नातरीउदकाचा तरंग॥ तेथ दुसरानाहींभाग तोविरालिया चांग॥उदकउदकीं॥१६॥ परिजळावांचोनिकांहीं आणिकविजातीयनाहीं॥ तैसेंमनमाघारेंआत्मयाचेठायीं॥ तंव तें नाहींचहोय॥१७॥ तोतरंगकांदोरा॥ उठवीपीळआणिवारा॥ तै सा हा लिंगदेहाचाउभारा॥ कारणमायाकरी॥१८॥ उकललिया कांसुरालिया॥ पिळवाराजाय लया॥ तैशीआत्मज्ञानेकारणमा या॥मिथ्याहोय॥१९॥ तरंगजळदोराकापुस॥ ऐक्यहोतांजाय

पर दुजाभास॥ तैसेंहोयमनस्वरूपींसमरस॥ तेथेंअज्ञानहारपे॥२० प्र
८ असोहेस्फूर्तीकल्पना॥ बोलिजेलिंगदेह अंतःकरणा॥ तेथेंस्वभाव ५
स्थाजाणा॥ वासनामय॥२१॥ मनप्रवर्त्तेइंद्रियद्वारें॥ तेवासना
अभ्यंतरींविवरे॥ तेंस्वप्नावस्थामांडेबारे॥ श्रुतदृष्टआभास॥२२
तैजसअभिमानीदृश्य॥ याइतुकीयाओळखीस॥ असेअंतःक
रणींचिदाभास॥ व्यापकतो॥२३॥ जैसाआदित्यलोहींपडेअग्नी
तोनव्हेकायदिनमणी॥ तैसाबिंबलाजोअंतःकरणीं॥ तोस्वयं
प्रकाश॥२४॥ यांततुझीएकजाणीवनाहीं॥ तरिहेंइत्यादिकन
स्फुरेकाहीं॥ यालागिंचिदाभासेंआभासपाहीं॥ भासविला॥
२५॥ तुझीएकजाणिवखंडे॥ तरीकांहींनपुढेंमांडे॥ तेथेंतुवांचि
उरिजेअखंडें॥ स्वस्वरूपें॥२६॥ तूंचिस्फुरशीबोलशीएकशी॥ ८
अंतरींचेंअंतरजाणशी॥ तूंचिपाहेंतुजशी॥ विचारूनियां॥२७॥

जयाचेनप्रकाशें ॥ अंतःकरणप्रकाशे ॥ जोनिजतेजेंस्फुरतसे ॥
तेंजाणतूंची ॥ २८ ॥ तेचिजाणिवधरूनिउल्हासे ॥ तरिनसतेंचि
दृश्यभासे ॥ तेतेजाणीवनिरसे ॥ तैंआत्मालाभे ॥ २९ ॥ जाणिवे
चियेवेळे ॥ जेंतियेपुढेंआभासलें ॥ तेंदृश्यह्मणोनित्यजिलें ॥ तेथें
उरलेंतेंची ॥ ३० ॥ जेंजेंभासेंजाणाविये ॥ तेंतेंजरीनिरसूनिजाये ॥
तरीजाणीवचिआहे ॥ तेचिपाहेंतियेतें ॥ ३१ ॥ तेजाणीवचिआ
त्मयाचीप्रभा ॥ तोस्वयंभूतियेतेंउभा ॥ दीपआपुलियाशोभा ॥
आपणजैसा ॥ ३२ ॥ दृश्यमृगजळआभासन ॥ तेंकरुनियांनिर
सन ॥ तूंपाहेंबाकवण ॥ आपणऐसें ॥ ३३ ॥ इतिश्रीपरमामृते
मुकुंदराजविरचिते लिंगदेहनिरसनंनामपंचमप्रकरणंसंपूर्ण
॥ ५ ॥ छ ॥ ॥ छ ॥ ॥ छ ॥ ॥ छ ॥ ॥ छ ॥

तरीनेणिवेकांगुंतली॥ नाथिलाची॥ ८॥ तूंआत्मास्वयंप्रकाश
तेथेंनेणिवमिथ्याभ्रमभास॥ तोनिरसतां तूंअविनाश॥ स्वतःसिद्ध
९॥ यासर्वांसिजोजाणे॥ तो कायआपणातेंनेणे॥ नेणिवेसतरी
कळवें॥ असेंचिना॥ १०॥ ऐसेंनेणिवतेंचिकारण॥ कार्यस्थूळ
सूक्ष्मजाण॥ तियेंकारणसुषुप्तीचें लक्षण॥ ऐकआतां॥ ११॥ म
नप्रवर्तेइंद्रियद्वारें॥ बाह्यविषयव्यवहारें॥ तेंजागृतीहेंखरें॥ जा
णिजेसु॥ १२॥ तोआभासघेऊनिअंतरी॥ मनसूक्ष्मकल्पनाक
री॥ तेंधवांस्वप्नावस्थाबरी॥ मांडे तेथें॥ १३॥ परीजाणीवदोहीं
चीएक॥ तेआपणियाकरीनिःशेख॥ तेव्हांसुषुप्तीअवस्थादेख॥
अज्ञानगडद॥ १४॥ ते नेणिवचिआहेजाणिव॥ परीधरिलाविप
रीतभाव॥ आपआपणा नाठव॥ अज्ञानवशें॥ १५॥ आपआप
णाविसरली॥ मगप्रपंचाचाआभासकल्पूंलागली॥ मीजीवही

पर ९ श्रीगुरुभ्योनमः॥ ॥ नेणों ह्मणशीते नेणिव॥ तोमिथ्या भ्रमभा प्र ६
व॥ रूपासारिखे अवयव॥ छायेसजैसे॥ १॥ आपआपणिया
जाणता॥ सदैवअसे सर्वथा॥ नातरी नकळण्याचीअवस्था॥
कवणसांगे॥ २॥ आपआपणाजाणतो निके॥ तेथें नेणीवआड
ठाके॥ तरीइयेचें पारखें॥ पण कवणसांगे॥ ३॥ नकळे ऐसें जा
णवलें॥ तें नकळण्यासि नाहीं कळलें॥ ह्मणोनि नेणणें जयावि
वळे॥ तोचिजाणआत्मा॥ ४॥ आपुलिया जाणिवा॥ धरिशी ने
णीवभावा॥ याकारणें गोवा॥ पडे जयाचा तयासी॥ ५॥ आप
आपलिया नकळे हे नेणिव॥ ऐसें ह्मणावें तरीतोचिजाणीव भा
व॥ ह्मणोनियां नेणिव॥ मिथ्याभ्रांती॥ ६॥ नेणीवजरीजा-
णीतली॥ तरी ते नेणीवमिथ्याझाली॥ तेथीलजाणीवउरली॥ ९
आत्मप्रभा॥ ७॥ तूंचिआपणानेणशी॥ ऐसें तूंचिजाणशी॥

तेथें जाणीव राहिली एकली ॥ ते निज हष्टी बोलिली ॥ आत्मरूप ४ ॥ जो आपलिया जाणिवा ॥ जाणे प्रपंचा सर्वा ॥ तया आपणा जाणा वयागोवा ॥ पडे नेणिवेचा ॥ ५ ॥ ते नेणीव फिटे गुरुरखुणा ॥ जाणे आपण आपणा ॥ बोलिजे या अनुसंधाना ॥ महाकारण ऐसें ६ ॥ फिटूनियां नेणणें ॥ आप आपणा जाणणें ॥ तिहीं देहांचे नि-साक्षिपणें ॥ महाकारण देह ॥ ७ ॥ तिहीं अवस्थांचे जाणपण ॥ तिये सि तूर्या अवस्था ऐशी रखुण ॥ तिहीं देहांचें अवलोकन ॥ तें महाकार या देह ॥ ८ ॥ मी सर्व साक्षी आपण ॥ हा प्रत्यगात्म्याचा अभिमान सर्वांचि जेथें खुंटलें स्फुरण ॥ तें शुद्धस्वरूप ॥ ९ ॥ कार्यकारणाचें-कारण ॥ यालागिं बोलिजे महाकारण ॥ कार्यकारण झालिया शू-न्य ॥ महाकारण कवण ह्मणे ॥ १० ॥ आहे स्वयंभ आपण ॥ जाणे आपली आपण रखुण ॥ परब्रह्म निर्वाण ॥ निजस्वरूप ॥ ११ ॥ ऐसें

पर च्चभुली॥ सुषुप्तीसी॥ १६॥ तेनेणीवजैंफिटे॥ तैंस्वयंभस्वरूपउ प्र.
१० मटे॥ जैसेंकिडाळजळालियापुढें॥ शुद्धराहे॥ १७॥ नेणिवेपासा ६
वउगवतां॥ अभिमानहोयधरिता॥ तोप्राज्ञहेव्यवस्था॥ कारणदे
हाची॥ १८॥ इतिश्रीपरमामृतेमुकुंदराजविरचितेकारणदेहनिर
सनंनामषष्ठमप्रकरणंसंपूर्णम्॥ ६॥ ॥ छ॥ ॥ छ॥

श्रीगुरुभ्योनमः॥ ॥हाअवघादृश्याकार॥ भासेजाणिवेसमो
र॥ तोनिरसूनितूंचिउर॥ ज्ञानस्वरूप॥ १॥ नेणिवेच्यानेणिवभावा
तूंचिजाणसीस्वयमेवा॥ तेजाणीवधरूनिआपलियाखेवा॥ आप
णारिघावें॥ २॥ आपआपणासिजाणतां॥ नेणिवआहेकींआतां १०
स्वयेंचिहोऊनिज्ञाता॥ निरसींनेणिव॥ ३॥ नेणीवजेथेंनिरसली

श्रीगुरुभ्योनमः॥ ॥जरीतेंशून्यभाविजे॥ तरीकल्पूनिनां
वठेविजे॥ जेंआपणाआपणबुझे॥ तेंशून्यकैसें॥ १॥ जोसर्वशून्या
तेंजाणें॥ तयाशून्यऐसेंकवणह्मणे॥ जेंकांहींनाहींनेणें॥ आपणा
केविंजाणिजे॥ २॥ जयास्वरूपींनुरेदृश्य॥ दृश्याविद्रष्टत्वअदृश्य
जयाचेंतयासीचप्रकाश॥ स्वस्वरूपसदा॥ ३॥ सर्वहीनिरसूनिजा
णिव॥ उरलेंसाडूननेणिव॥ तयांज्ञानाजाणावयाभाव॥ नस्फुरे
कांहीं॥ ४॥ ह्मणोनआभावऐसाभासे॥ परीशून्यह्मणावेंकैसें॥
जेंसर्वासिजाणोनिअसे॥ शून्यासमवेत॥ ५॥ शून्यातेंशून्यपण
जाणीवकल्पीआपण॥ तेस्वरूपींहोयलीन॥ शून्यासहित॥ ६॥
तेंशून्यनाजाणिव॥ दृश्यनानेणिव॥ ज्ञप्तिमात्रभरींव॥ स्वस्वरूप
७॥ जेंनिरंतरनिर्मळ॥ ज्ञानघनकेवळ॥ चिदाकाशअखिल॥
अगोचर॥ ८॥ जेथेंशून्यदृश्याकार॥ अज्ञाननिरसूनिअनिवार

आपुलेंअनुसंधान॥ करितांहोयविज्ञान॥ प्रपंचाचेंमिथ्यापण
प्रत्ययाये॥१२॥ मीशुद्धात्माआपण॥ ऐसावर्त्तेजोअभिमान॥
तयाचाहीसाक्षीकवण॥ तुजवांचोनी॥ १३॥ ह्मणोनजाणिवेचें
जेंनिजज्ञान॥ तेंशुद्धस्वरूपआपण॥ सर्वनिरसीपरिपूर्ण॥ निजा
त्मातूं॥ १४॥ ज्ञानजेथूनिस्फुरावें॥ तेंआपणचिस्वभावें॥ ऐसें
स्वरूपअनुभवावें॥ जाणपेंगा॥१५॥ जेथेंजाणीवखुंटे॥ तेंतु-
झेंस्वरूपनेटेंवोटें॥ घनानंदचढेनावोहटे॥ अपरिमित॥१६॥ जें
अमर्यादअमुप॥ तेंजाणिजेआपेंआप॥ अविनाशस्वरूप॥ अखं
डित॥१७॥ इतिश्रीपरमामृतेमुकुंदराजविरचितेमहाकारणदे
हनिरसनंनामसप्तमप्रकरणंसंपूर्णम्॥ ७॥ ॥ छ॥ ॥ छ॥

कैवल्यामाजी॥ १७॥ इतिश्रीपरमामृतेमुकुंदराजविरचितेशून्य खंडनंनामअष्टमप्रकरणंसंपूर्णम्॥ ८॥ ॥ छ॥ ॥ छ॥ ॥

श्रीगुरुभ्योनमः॥ तरीहेसांगीतल्यापरी॥ तेंस्वरूपनिर्धारी॥ मग एेसाचअभ्यासकरी॥ नित्यनेमेंसी॥ १॥ पाहिजेएकांतस्थान जेथेंचंचळनहोयमन॥ सकळवृत्तीतेंआवरून॥ बैसावेंनेथें॥ २ करूनिविषयाचीनिवृत्ती॥ चित्तासिप्रत्यगावृत्ती॥ धरीहृदयमाजीं विरक्ती॥ त्यागबुद्धी॥ ३॥ बैसोनिआसनींसावकाशें॥ अंतरामा जीप्रवेशें॥ एकवटीइंद्रियद्वारींबैसें॥ मनोवृत्तिजे॥ ४॥ सांडूनिअ भिमानस्थूळाचा॥ भावधरींअंतराचा॥ अभावकरूनिसर्वांचा॥ गगनपाहीं॥ ५॥ स्थूळइंद्रियांमधून॥ युक्तीनेंएकवटींमन॥ अं

जेंसूक्ष्माहूनिसूक्ष्मसपुर॥ निजज्ञान॥ ९॥जेंनिष्कळंकज्ञाना
काश॥ कराशून्याकाशाचायारा॥ तोनिजदृष्टास्वयंप्रकाश॥ प
रमात्मातूं॥ १०॥ तोतूंनिरालंबसाक्षी॥ निर्लेपकसर्वपक्षी॥ पा
रावाररहितनिरीक्षी॥ देखणातूंहोउनी॥ ११॥जें ज्ञानाचेंजि
व्हार॥ आस्तिकाचेंघर॥ सुखाचेंसागर॥ घनानंदतूं॥ १२॥
जेंसर्वसाक्षीचेंदीपन॥ जेंप्रकाशाचेंकोंदण॥ जेंआत्मानंदाचें
निधान॥ तेंकैवल्यतूं॥ १३॥ जेंसकळनिरासेंशुद्धबुद्ध॥ जेथेंनु
रेस्वंपद॥ सरेतत्पदशुद्ध॥ असीपदेंसीं॥ १४॥ ऐसा तूंपरमात्मा
परीतुझात्वांहारविला महिमा॥ आतांमिळूनि राहिजे निजधामा
कैसियापरी॥ १५॥ तोलक्षांशअनुवादणें॥ परिसावाशुद्धअं
तःकरणें॥ नित्यजैसेंअभ्यासणें॥ तेसेंसांगूं॥ १६॥ जेपोंस्वरू
पींनिश्चयबैसे॥ शुद्धपरमात्माप्रकाशे॥ सदाचित्तरमोनिसमरसे

चिलागे ॥ १४ ॥ तेथें जें जें हृदयस्फुरे ॥ तें तें सोडून होयीं माघारें ॥ ज्ञा
नस्वरूप निर्धारें ॥ आपण होइजे ॥ १५ ॥ देखणेंचि देखण्यावरी ॥
परतोनराहे जरी ॥ तरी हृदयाकार उरी ॥ कैसेनि होय ॥ १६ ॥ साका
रादि आघवें ॥ शून्य होय स्वभावें ॥ तेथें आपण पाहावें ॥ आत्मस्व
रूप ॥ १७ ॥ जैसें वादलिया नीरा ॥ नुरे काहीं आकार ॥ अंतःकरणा
दि व्यवहार ॥ तैसा होय ॥ १८ ॥ जैसें कूर्में अकुंचन केलें ॥ करचरण
शीर अंतरीं नेलें ॥ मग आपणियां आपण उरलें ॥ अखंडीत ॥ १९ ॥
जाणीवयाचि परी ॥ प्रवेशतां अंतरीं ॥ तेथें एकलीच उरे उरी ॥ आप
णियाची ॥ २० ॥ आपण एकीं एकला ॥ दुजा नाहीं देखिला ॥ ज्ञान
मात्र संचला ॥ आत्माराम ॥ २२ ॥ इति श्री परमामृते मुकुंदराज वि
रचिते अभ्यासयोगे निदिध्यासनं नाम नवम प्रकरणं संपूर्णम् ॥ ९ ॥

तराकाशीनेऊन॥ स्थिरकरीं॥ ६॥ जेजेवृत्तिबाहेरधांवे॥ तिये
नेंपरतोनआणावें॥ येणेंअभ्यासेंस्थिरावे॥ आपेआप॥ ७॥
नातरीजिकडेमनाचीराहाटी॥ नलागावेंतयाचेपाठी॥ माघारी
घालोनियांदृष्टी॥ स्वस्वरूपेंसिठेविजे॥ ८॥ मनजोजोविषयधरी
तोतोविवेकेंविदारी॥ नरीतोस्थिरावेअंतरीं॥ सांडूनिकल्पना॥
९॥ तेथेंहृदयाकाशीं॥ मीपणस्फुरेजीवासी॥ तेंचिविवेकेंसी॥
पाहिजेजंव॥ १०॥ तंवतेंनिरालंबींस्फुरे॥ पुनरपितेथेंचिमुरे॥ त
रीजीवदशाबारे॥ नास्तिक्यत्वपावे॥ ११॥ नदीउगमींस्थिरावे॥ त
रीसिंधूपणकांनपावे॥ तैसेंजीवाचेंब्रह्मकांनव्हावें॥ यास्थितीरा
हतां॥ १२॥ ह्मणूनिपरतावेंअभ्यंतरीं॥ अभ्यासकरावाऐशिया
परी॥ मगकल्पनाअभ्यंतरीं॥ समरसोनिजाय॥ १३॥ सोडूनस्थू १३
ळगती॥ ऐशीराहेअंतरस्थिती॥ तोंवरीअभ्यासनिगुती॥ करावा

कवणेठायीं॥ ८ ॥ साकारहात्रिलोकु॥ नेणोंकायझालासकळिकु संचलोंमीएकाएकू॥ चिदाकाश॥ ९॥ अंत बाह्य परिपूर्ण॥ शून्य झालेंहृदयाचें भान॥ असणेंआपणियाआपणा॥ एकत्वरहित॥ १०॥ तेथेंआंधारींगेली॥ मनबुद्धीमावळली॥ आत्मप्रभाउजळली चिदादित्याची॥ ११॥ येणेंपरीस्थुळाचा॥ प्रवृत्तमोडलाजागृती- चा॥ आतांनिरासलिंगदेहाचा॥ तैसाचकीजे॥ १२॥ स्फूर्त्तिस्फुरे जेथुनी॥ तेंपाहिलेंचिअसेअस्फूर्त्तीपणीं॥ मजदेखतांउमटोनी॥ मा वळेस्फूर्त्ती॥ १३॥ तूंतयेस्फूर्त्तीचाजाण॥ संकल्पविकल्पात्मका चेंजीवन॥ निश्चयाचेंकारण॥ तूंचिअसे॥ १४॥ अनुसंधानपू र्वीचिअसे॥ ह्मणूनितेंउपजतांतुजदिसे॥ अहंतातुझेनिआंगेंवसे तेहितूंचिजाणा॥ १५॥ ऐसेंपांचाभेदींअंतःकरण॥ हेंहितूंचिस्फु रेंजाण॥ तेंसांडितांकायतुजविण॥ वेगळेंपडे॥ १६॥ जळेंतरंग

श्रीगुरुभ्योनमः॥ ॥ऐसाउमज नहोतां॥ अज्ञानगडदामाजी
पडतां॥ नकळेह्मणोनिभ्रमतां॥ वेडलागे॥ १॥ तोभ्रमआपण-
चिवाहे॥ नाथिलेंअज्ञानधरूनिराहे॥ वायांसंदेहींपाहे॥ नकळे
ह्मणोनी॥ २॥ उजेडींचाघरांतआला॥ तंवदृष्टीअंधारभरला॥
डोळेअसतांअदेखणाझाला॥ आपणाशितो॥ ३॥ कांनिशीचि
यादोनप्रहरीं॥ डोळियांगडदपडेभारी॥ तैसाअज्ञानआंधारीं॥
गुंतोंनको॥ ४॥ तेथेंमनासिजेंजेंकल्पणें॥ तेंतेंसन्मुखदेखणें॥ दृ
श्यनिरसोनिराहणें॥ स्वस्वरूपींनिश्चळत्वें॥ ५॥ बोलेआपण
आपणाशी॥ अंतरींआपणांआपणउपदेशी॥ पाहेंतयाविवेकासी॥
कांहींआकारअसेना॥ ६॥ जेथूनिउपजेविवेकमातू॥ पाहेतयाअं
तःकरणातू॥ तेंहिधरूनिजाणीवहेतू॥ जाणतेंहोय॥ ७॥ देहास
हितब्रह्मांडशून्य॥ झालियाउरेपरिपूर्ण॥ कांहींनदिसेस्थानमान

रीकाये॥ ज्ञानेंवीणास्थिरत्वआहे॥बुद्धीसकोठें॥२५॥ तेंज्ञानज
रीअधिष्ठान॥ तरीसंकल्पविकल्पात्मकमन॥ तेंचिज्ञानपरिपूर्ण
यालागिस्फुरणअसेना॥२६॥ तेंस्मरतांनयेस्मरण॥स्मरणजया
चेंविस्मरण॥ तेंज्ञाननाअज्ञान॥ ज्ञप्तिमात्रजें॥ २७॥ कांहींवृत्ती
भासभासे॥ तोस्फुरनांचिनयादिसे॥ परीस्वतांआपणअसे॥ नि
राभास॥ २८॥ तोनिराभास ह्मणावाकवण॥ तेंचितयाअसेजा
ण॥ जाणीवहीजिरवून॥ आंगींचेआंगीं॥ २९॥ यालागींजाणीव
नेणीव॥ भावनाआभाव॥ तेचितेंस्वयंमेव॥स्वस्वरूप॥ ३०॥इति
श्रीपरमामृतेमुकुंदराजविरचितेदृश्यभासखंडननिदध्यासनंनाम
दशमप्रकरणंसंपूर्णं॥ १०॥ ॥ छ॥ ॥ छ॥ ॥ छ॥

पत्र १५ केवींसांडावा॥आकाशेंवायुकेवींदवडावा॥ तेविंतुझ्यास्फूर्तिभा प्र.
१५ वा॥ कैसेनिदवडिजे॥ १७॥ तरंगजळींविरे॥ वायुगगनींमुरे॥ तै १०
शीतुझींस्फूर्तिस्फुरे॥ तुजमाजी॥ १८॥ झाडितांआपलाहात॥
तवआंगासिअसेजडित॥ तैसीअंतःकरणस्फूर्तिमूर्त्तिमंत॥ केवी
सांडिशी॥१९॥ सांडूंपाहशीतंवतेचिस्फूर्त्ती॥ करूंपाहशीतव
तेचिवृत्ती॥ विचारूंपाहसीतंवतेचमती॥ मनचित्तें॥२०॥ चिंतूंपा
हशीतंवतेंचित्त॥ मीह्मणतांअहंकारहोत॥ उगाचिअसतांस्वस्थ
स्वस्थतास्फुरे॥ २१॥ जरिउगाचिअसता॥ तरिकांभाववूस्फुरता
संकल्पविकल्पकरिता॥ कासयासी॥ २२॥ एकनिश्चयधरिता॥
तरीकांपुनःपुन्हाचिंतिता॥ देहत्वेंकांआंगवता॥ मीह्मणोनी॥ २३
ह्मणोनिहेंअसतचिसरे॥ ऐसेंवर्मआहेबारे॥ तेंज्ञाननसतेंतरीअ १५
हंकारें॥ केविंउविजे॥ २४॥ आठवचित्तींजोराहे॥ तेंज्ञाननव्हेत

चिदेखणें ॥ ह्मणोनितयासितेंपाहाणें ॥ जेंजाणवलेंतेंनिरसणें ॥
उरेतेंची ॥ १० ॥ दृश्यद्रष्टादर्शन ॥ यातिन्हीभावाविलक्षण ॥ एक
लेंचिआपण ॥ ज्ञप्तिमात्र ॥ ११ ॥ दृश्यदर्शनहरपे ॥ तेंथेंउरिजेस्व
स्वरूपें ॥ अखंडीतआपआपें ॥ निरामय ॥ १२ ॥ जायलयासर्वधि
सणें ॥ तेंथेंखुंटलेंदेखणें ॥ मगदेखणेंआपुलेंयाखुणें ॥ सदोदित
॥ १३ ॥ तेंआपणचिआपण ॥ अविनाशपरिपूर्ण ॥ ऐसेंओळखावें
परतोन ॥ स्वस्वरूप ॥ १४ ॥ नेणिवेच्यानिरासें ॥ कारणशरीरना-
से ॥ जाणीवहीसमरसे ॥ महाकारणीं ॥ १५ ॥ सुषुप्तीआणितुर्या
प्राज्ञप्रत्यगात्माअभिमानिया ॥ विश्वतैजसगेलिया ॥ जागृस्वप्न
केंन्वें ॥ १६ ॥ एवंदेहचतुष्टयाचेंनिरासा ॥ करूनिजाणिजेअविना
शा ॥ तंवआपणचिस्वयंप्रकाशा ॥ ज्ञानघना ॥ १७ ॥ सांडूनिआपु
लेजाणिवेशी ॥ जेंस्वस्थउगाराहासी ॥ तेंकायआहेमगजाणशी

पर श्रीगुरुभ्योनमः॥ ॥आपणआपणासिनेणे॥ ऐसेंआपणाचि अं
१६ जाणे॥जाणपणहेंतुमजणें॥ तेंचिपैतें॥१॥ नेणिवेच्याग्रासें॥ जा ११
णीवउरलीदिसे॥ तेंचितेथेंवसेऐसें॥ केविघडे॥२॥ ज्ञाणीवाने
णिवा॥ दोहींविरहितभावा॥ दोहींबिजावोलावा॥ विस्तारितातो
३॥ तोजाणिवानेणिवा॥ नातुकेंदोन्हीभावा॥ आधींचअसेतोजा
णावा॥ स्वरुपानंद॥४॥ काहींचनस्फुरतांआदी॥ जेंस्थळअसेंअ
नादी॥ जेंज्ञानाचीकदी॥ ज्ञप्तिमात्र॥५॥ जेंनिष्कळंकज्ञानघना
नंद॥ आपणाचिआपणास्वतःसिद्ध॥ निजरूपविशुद्ध॥ स्वसंवेद्य॥
६॥ जेजाणेचिजाणणें॥ ह्मणूनिनाहींतेथेंनेणणें॥ तेंआपआपणा
एकपणें॥ जाणेनानेणे॥७॥ तेंपरिपूर्णएकलें॥ ह्मणोनिदिसावें
हेंखुंटलें॥ घनानंदकोंदाटलें॥ स्वस्वरूप॥८॥ दिसतेंतेंदुसरें॥ तें १६
हिजेथेंसरे॥ मगदेखणेंचिउरे॥ तेंचितयाकेविदिसे॥९॥ तेंदेखणें

स्वस्वरूपीं॥ २७॥ विसरे प्रकाशे स्वरूप॥ हारपे सांपडे आपेआप॥ ऐसा करितां आक्षेप॥ मग स्थिरावे॥ २८॥ निवांत भोगी स्वरूप॥ डुल्लत आनंदें आपेआप॥ मग तया सुखाचें माप॥ कवण करी॥ २९॥ इतिश्री परमामृते मुकुंदराजविरचिते अज्ञानखंडनं नाम एकादशप्रकरणं संपूर्णम्॥ ११॥ ॥ छ॥ ॥ छ॥ ॥ छ॥ ॥ छ॥ ॥

श्रीगुरुभ्यो नमः॥ ॥ श्वेदकंपादि उठती॥ अष्टसात्विकभाव प्रगटती॥ पावे साम्राज्यसंपत्ती॥ रंक जैसा॥ १॥ चित्त चैतन्यीं हारपे॥ उरिजे ज्ञप्तिस्वरूपें॥ अखंडित आपआपें॥ ब्रह्मानंद॥ २॥ तया सुखाचे निसमरसें॥ पावे सुलीनदशे॥ तें बोलावें कैसें॥ अनुभवी जाणती॥ ३॥ जैसें अमृत चाखवे आपुलें चवी॥ तैसें स्वसुखें अनुभवी॥ तेथें कोण

निःसंगपणें॥ १८॥ जेव्हांजाणिवेतेंसोडिलें॥ तेव्हांस्फुरणथिरवुट
लें॥ उठलेठायींलयागेलें॥ तूजचिमाजी॥ १९॥ जाणीवशून्यास-
हित॥ तुजमाजीसामावत॥ तोतूंआत्माअपरमित॥ स्वयंभमूर्ती॥ २०
तेथेंजाणीवनेणिवनाहीं॥ शब्दनिःशब्दकांहीं॥ रूपअरूपहेंही॥ ने
णिजेसोय॥ २१॥ देखतेंनाअदेखण॥ परकीयनाआपण॥ स्मरणना
विस्मरण॥ स्मृतिमात्रजें॥ २२॥ वृत्तिनानिवृत्ती॥ अपूर्णनापूर्णस्थि
ती॥ अभावनाभावप्रतीती॥ प्रतितीमात्रजें॥ २३॥ धरितांसांडितां
नये॥ नाहींआहेह्मणणेंराहे॥ अनुभवींअनुभवितांनये॥ ठायींने
णिजे॥ २४॥ ऐसेंहेंअभ्यासणें॥ अंतरींचेंअंतरींजाणणें॥ निश्चळ
स्वरूपींस्थिरावणें॥ कीजेमनाचें॥ २५॥ स्वस्वरूपजाणिजे॥ मगआ
लिंगोनिराहिजे॥ स्वयेंचिचंचळपणकीजे॥ कल्पनाव्यापार॥ २६॥ ऐ १७
सेंकरितांमनविरमे॥ विषयव्यापारशमे॥ मगचित्तरमे॥ कांहींकांहीं

पर. आठवी ॥ संसारासी ॥ ४ ॥ बोलेस्वानंदाचा धन ॥ दाटेसुखपरिपूर्ण ॥ प्र.
१८ तयामाजीविवेकसुजाण ॥ हारपोनिजाय ॥ ५ ॥ अहंतास्वरूपींगळे ॥ १२
विषयतृष्णामावळे ॥ इंद्रियांचेलळे ॥ क्रियेविणपूर्णहोती ॥ ६ ॥ म-
हासुखाचेओरुवारीं ॥ आलिंगीस्वानुभूतीसुंदरी ॥ ज्ञानमात्रइयापरी
स्वस्वरूपभोगी ॥ ७ ॥ निरसितांनेणिव ॥ स्वरूपींसमरसेजाणिव ॥
मगएकछत्रीराणिव ॥ योगियासी ॥ ८ ॥ सदास्वानंदाचेसोहळे ॥
विषयविजातीवितळे ॥ स्वरूपसुखाचेनिमेळे ॥ इंद्रियांतृप्ती ॥ ९ ॥ प
रमसुखाचेनिभयें ॥ एकहिस्फूर्त्तीनस्फुरे ॥ कार्यजातीविसरे ॥ निमि
ष्यांत ॥ करूनियज्ञाचियाकोडी ॥ उभधितीस्वर्गाचीगुडी ॥ तेंसुखकी
जेकुर्वंडी ॥ याब्रह्मसुखासी ॥ ११ ॥ आनंदआनंदाशिघोंटी ॥ बोलतां
परेसिपडेमिठी ॥ मुक्यानेसुखाच्यागोष्टी ॥ केविकीजे ॥ १२ ॥ खुंटलें १८
मनाचेंजाणणें ॥ तेंसुखअनुवादावेंकवणें ॥ हेंअनुभवीनोचिजाणे ॥ इ

नराटकमक॥ १३॥ इतिश्रीपरमामृतेमुकुंदराजविरचितेस्वानुभवसु
रववर्णनंनामद्वादशप्रकरणंसंपूर्णम्॥ १२॥ ॥ छ॥ ॥ छ

श्रीगुरुभ्योनमः॥ ॥ ऐशीपावोनयोगरवुण॥ स्वानंदभोगितोपरि
पूर्ण॥ तयायोगियानघडेशीण॥ संसाराचा॥ १॥ झालेब्रह्मआपण॥
योगीसहजपरिपूर्ण॥ सदास्वानंदनिमग्न॥ ज्ञप्तिमात्र॥ २॥ संकल्पआ
णिविकल्प॥ दोनीनदिसतीअल्प॥ सुरवपावलअमुप॥ ह्मणानिया
३॥ साधनअसाधनरवुंटलें॥ अकरणेंकरणेंमोडलें॥ आपणचिते-
झाले॥ परब्रह्म॥ ४॥ नाहींधारणध्यान॥ नाहींसमाधीआसन॥
चुबुकळीतआनंदघन॥ आपणामाजी॥ ५॥ भुवनत्रयींक्रीडती॥ स्व
इच्छावर्तती॥ अरवंडस्फुरेज्ञप्ती॥ ह्मणोनियां॥ ६॥ विधींनिषेधाची

तीनें॥ १५॥आणिविश्वामाजीईश्वरू॥एकचिव्यापकसद्गुरू॥ ह्मणोनिसर्वांभूतिआदरू॥ करितीते॥ १६॥ हृदयजयांचेंकोमळ॥ सदाशुचिष्मतनिर्मळ॥ निरंतरआचारशीळ॥ पवित्रपणें॥ १७॥ नपाहातीमानापमान॥ निंदास्तुतिसमाधान। धैर्यपणें मन॥ नांदतजयाचें॥ १८॥ सुखदुःखनगणी॥ समाधानलाभहानी ॥उदारतेअंतःकरणीं॥नशुंततीकोठें॥ १९॥ सदांविवेकींचित्तवृत्ती॥ पडोनदेती विस्मृती॥सावधानअहोराती॥ आत्मस्वरूपीं॥ २०॥ कांधरीपिशाचलीला॥ नरीहोयजगावेगळा॥ लोकांनदाखवीडोळा॥ ब्राह्मणपण॥ २१॥ इत्यादिआचारदाविती॥ कळापेक्षानभाविती॥ लोकांसिदेखलाविती॥ वर्ततीअसे॥ २२॥ विश्वसाक्षीयोगीराणा॥जाणेसर्वांतरींच्याखुणा॥ परीतोवाटे जना॥ वेडियाऐसा॥ २३॥ असेतरीलोकांमाजी॥ परीवर्मकि-

पर कडसणी॥ नधरतेजयाअंतःकरणीं॥ पापपुण्याचीकाहाणी॥ तेहि प्र.
१९ नेणती॥७॥शुभाशुभफळें॥ नबाधतीकवणेवेळे॥ तेसर्वापासू १३
नसुटले॥जीवन्मुक्त॥८॥ बद्धमोक्षाचीवार्ता॥ नायकतीसर्वथा॥
सहजचिध्यातीशाश्वता॥ अखंडितासी॥९॥जेमनापासोनिसु
टले॥ नयासंशयनुरले॥ करणीयअकरणीयगेलें॥ सर्वधर्म॥१०
ऐसेंहोऊनिनिभ्रांत॥ कळोंनदेतीआपुलाअंत॥ लोकांमाजीदा
वित॥ भक्तिरहस्य॥११॥ भक्तिज्ञानवैराग्यपाहीं॥ करूनिदावि
तीआपुलेदेहीं॥ जगासिलावितीसोयी॥ तारकते॥१२॥ भोगि
तीस्वरूपरहस्य॥ करितांसद्गुरूचेंदास्य॥ परीभेदनाहींसमरस्य॥
जाणतीजीवेश्वराचें॥१३॥ प्रेमेंस्फुंदतीनित्य॥ स्मरणाविस्मरणें
वीणनेमस्त॥ क्षणक्षणाउच्चारित॥ नामगुरूचें॥१४॥ गुरूपरमे १९
श्वरऐकता॥ तद्रूपजाणोनिभजतां॥ सन्मानदेतीसंतां॥ अतिप्री

यासर्वत्यजी॥ राहेसहजासहजीं॥ निष्कर्मपणें॥ २४॥ आपण
एकसर्वेश्वरू॥ कोणासांगेनाव्यवहारू॥ क्रियाकर्मनसांगेकरूं
नाथिलेंची॥ २५॥ उयरवळतादावीनसे॥ तेणेंलोकहासतसे॥ हेंहि
नयानाहींपिसें॥ अद्वैतपणें॥ २६॥ ऐशियास्थितीराहावें॥ स्वरू
पजाणोनिभोगावें॥ जनउद्धरावेंकींत्यजावें॥ नस्मरेतो॥ २७॥ वि
श्वआपणभोगोनभोगो॥ परीस्वरूपनयासांगो॥ हेंकाहींनदेलां-
गों॥ आपणाकडे॥ २८॥ विश्वाचादाहोनलागेआंगा॥ तोद्वंद्वाती
तपैंगा॥ एकदेशीयाजगा॥ नपाहेयोगी॥ २९॥ ॥ इतिश्रीपरमा
मृतेमुकुंदराजविरचितेमुक्तिरहस्यनिरूपणंनामत्रयोदशप्रकरणं
संपूर्णम्॥ १३॥ ॥ छ॥ ॥ छ॥ ॥ छ॥ ॥ छ॥

श्रीगुरुभ्योनमः॥ ॥ तूंसंशयनधरी॥ मुक्तवर्ततीदोहींपरी॥ परी
तूंअभ्यासकरीं॥ सांगीतलाऐसा॥ १॥ तैसासहजचिअसशी॥ प
रीआलेंपाहिजेप्रत्ययाशी॥ मगतूंज्ञानीचहोशी॥ जैसातैसा॥ २
पाहेंपांशेंदाडेंपिकलीं॥ तींकायदेंटींहूनसोडविली॥ तैशीदशाज
रीझाली॥ तरीराहिलें ध्यानीं॥ ३॥ तंवरीसांगीनलियारीती॥ स्व
रूपध्याइजेअतिप्रीती॥ तरीचसाधेपरमप्राप्ती॥ सत्यजाण॥ ४॥
नित्यकरावाऐसानेम॥ पडोंनद्यावासंसारभ्रम॥ धरावास्वरूपा
चाकाम॥ साधनपंथ॥ ५॥ हेंनित्यश्रवणकरावें॥ मननिदिध्यासें
अनुभवावें॥ आळसकरूननदवडावें॥ आयुष्यवृथा॥ ६॥ येविष
यींजोआळसी॥ तयापरमप्राप्तीनहोयकल्पांतेंसी॥ तोसद्गुरूचा
उपदेशी॥ म्हणोंचिनये॥ ७॥ आतांअसोबहूबोलणें॥ श्रीगुरू
सिधरींजीवेंप्राणें॥ नाहींसारतयाविणें॥ अन्यकाहीं॥ ८॥ तया

हीं॥ मगअनुभवेंसुखियाहोई॥ तरशीभवभया॥ १७॥ हेंशा
स्त्रगोप्यकरावें॥ कवणास्फुटनसांगावें॥ तुझेंतुवांअनुभवावें॥
गुरुगम्यहें॥१८॥पशुजनाश्रवणीं धालिशी॥ तरीकायसिद्धी
होयनयांसीं॥सद्भावदेखोनिकृपाकरिसी॥ तरीनिर्वाहकपा-
हिजे॥ १९॥जैशीगुरुमार्गींचीपरवडी॥ तैशीअसावीगुरुपदा-
चीगोडी॥ तरीप्रकाशहोतांअर्धघडी॥ नलागेबापा॥ २०॥गुरु-
सांप्रदायाचीवाट॥ नधरितांकरिशीलप्रगट॥ तरीगुजघेऊनि
चावटाहोतीलबहू॥ २१॥ यालागिंहृदयींगुप्तराख॥ स्वयेंपरमा
मृतचाख॥ सर्वयोगियांचातिलक॥ होशीलतूं॥ २२॥ परमामृ
तग्रंथप्रमाण॥ केलेंपरमार्थाचेंकथन॥जयासिपाहिजेगुरुखू
ण॥ तेणेंहाचिपाहावा॥ २३॥ हेंचिगुरुबीजकथन॥ ह्मणोनि
करावेंजतन॥ सेवूनिसद्गुरूचेचरण॥ सुखियाहोइजे॥ २४॥

चेवचनींराहीं। करूंनकोयेरकाहीं॥ तरीअनायासेंस्वरूपपाहीं
पावशीतूं॥ ९॥ वृद्धीपावेगुरुकृपा॥ ऐशियेस्थितीराहेंपां॥ गुरुक
र्षीहोयबापा॥ ऐसानवर्ते॥ १०॥ गुरुमहिमाअपारु। गुरुतोपरा
त्परु॥ तुजनकळेह्मणोनपरिहारू॥ देऊनसांगों॥ ११॥ आतांत
नमनधन॥ करींसद्गुरूसिसमर्पण॥ नाहींतयाविण॥ अन्यदैवत
जगीं॥ १२॥ गुरूतत्पदशिव॥ शिष्यत्वंपदजीव॥ ह्मणोनितयाचे
चरणींभाव॥ धरीऐक्यतेच्या॥ १३॥ गुरूतत्पदसागरू॥ शिष्य
त्वंपदतरंगाकारू॥ दोन्हीहारपोनिब्रह्मनिर्विकारू॥ आपणहोइ
जे॥ १४॥ गुरूभयेंप्रेमवाहासी॥ तरीअवश्यस्वरूपपावसी॥
कीटकभयेंआळसी॥ कैसेंजालें॥ १५॥ आळशीकीटकता॥
गुरूदेईलसायोज्यता॥ मगसुखियाहोशीतत्वता॥ स्वरूपींर
मशी॥ १६॥ तत्वतास्वरूपींभेदनाहीं॥ परितेंध्यानेकगम्यपा

ह्मणेमुकुंदराजयोगिया॥ ह्याबुद्धिजोअनुभविया॥ तोपाहेपर
तोनियां॥ आपुलेंस्वरूप॥ २५॥ इतिश्रीपरमामृतेमुकुंदराजवि
रचितेसाक्षात्कारोनामचतुर्दशप्रकरणंसंपूर्णम्॥ १४॥ ॥

समाप्त.

# दुर्बोधशब्दांचाअर्थसंग्रह.

| अनुक्रम नंबर. | शब्द. | अर्थ. | अनुक्रम नंबर. | शब्द. | अर्थ. |
|---|---|---|---|---|---|
| | अ. | | | अ. | |
| १ | अनंत | ज्याचाशेवटनाहीं तो; अपार, अगणित. | ८ | अभ्यंतर | हृदय, मन, अंतःकरण, मन. |
| | | | ९ | अपरोक्ष | प्रत्यक्ष. |
| २ | अपार | शेवट रहित, ज्यासपारनाहीं तो. | १० | अर्धमात्र | ईश्वरस्वरूप. |
| | | | ११ | अवस्थातित | अवस्थेच्या पली. |
| ३ | अविनाश | नाशरहित, ज्याचा नाश होत नाहीं. | १२ | अधरपुट | दोन ओष्ट. |
| | | | १३ | अखंडैकरस | ज्यास खंड (नाश) नाहीं असा एक रस. |
| ४ | अभिन्न | भेदाशिवाय. | | | |
| ५ | अलिप्त | निर्दोष, ज्यासदोषनाहीं. | १४ | असिजे | रहा. |
| ६ | असिपद | ब्रह्मपद. | १५ | आकुंचन | संकोच, कमीहोणें. |
| ७ | अधिष्ठान | आश्रय, आधार. | १६ | अस्ती | असणें, हाडें. |

| अनुक्रम नंबर. | शब्द. | अर्थ. |
|---|---|---|
| | **अ.** | |
| १७ | अवग्रहण. | वास घेणें. |
| १८ | अपान | अधोगमनकारक–खालीं सरणारा. |
| १९ | अनुसंधान | चिंतन, कथानक. |
| २० | अदीप्त | प्रकाशित नाहीं. |
| २१ | अभासन | दिसणें. |
| २२ | अवलोकन | पहाणें. |
| २३ | अपरमित | प्रमाणारहित (प्रमाण नाहीं) अमर्याद. |
| २४ | अमुप | अगणित (गणना नाहीं.) |
| २५ | अगोचर | न दिसणारे. न समजणारे. |
| २६ | अरुवार | अतिशयित. |

| अनुक्रम नंबर. | शब्द. | अर्थ. |
|---|---|---|
| | **अ.** | |
| २७ | अवर | आलीकडे. |
| २८ | आस्तिक्य | असणेपणा. |
| २९ | अनुवादणें | बोलणें. |
| ३० | अनादि | मूळ नाहीं उत्पत्ति रहित. |
| ३१ | अरुवारि | घरीं, गृहीं. |
| ३२ | अक्षी | एक कीड आहे. |
| ३३ | अरि | शत्रु, सपत्न. |
| ३४ | आनंदमय | आनंदरूप, आल्हादकारक |
| ३५ | आपुलेनी | आपल्याच. |
| ३६ | आदिशक्ति | मूळशक्ति-जगन्माता. |
| ३७ | आकाश | पोकळी, आभाळ. |

| अ०नं० | शब्द· | अर्थ· |
| --- | --- | --- |
| | **आ·** | |
| ३८ | आप | पाणी,उदक,जल तोय· |
| ३९ | आदिअग्र | अग्रापर्यंत-शेवटापर्यंत शेंड्याप०;मूळ शेंडा· |
| ४० | अग्र | शेवट,श्रेष्ठ· |
| ४१ | आडठाकून | आडून, लपून· |
| ४२ | आदान | घेणें· |
| ४३ | आनंद | सुख समाधान· |
| ४४ | आभास | कमी दिसणें· |
| ४५ | आंवरून | आटोपून धरून· |
| ४६ | आकोचन | संकोचन आकृतीनें कमी होणें· |
| ४७ | आहेमा | आहे असें· |
| ४८ | आचार्यशील | आचरण संपन्न आचारानें चालणारा· |

| अ०नं० | शब्द· | अर्थ· |
| --- | --- | --- |
| | **आ·** | |
| ४९ | आन | अन्य·दुसरा·परका· |
| ५० | आदि | मूळ· |
| ५१ | ओळखवी | ओळखवणें·ओळखवून संतुष्ट होणें· |
| ५२ | अंगवसे | शरीरासंबंधीं· |
| ५३ | अंगवित्त | बाळगता,बाळगणारा· |
| ५४ | अंगवण | अंगस्वभावाची रीत· |
| | **इ·** | |
| ५५ | ईश | नियंता·पति·पाळणारा· |
| ५६ | इयापरी | त्याप्रमाणें· |
| | **उ·** | |
| ५७ | उपाधि | दोषप्राप्तीचा हेतु,काळजी· |
| ५८ | उभारा | रचना· |
| ५९ | उमटे | उघडहोई· |

| अ· नं· | शब्द· | अर्थ. |
|---|---|---|
| ९ | उ· | |
| ६० | उर ······ | हृदय. वक्षस्थळ मानव पोट यां मधील भाग· |
| ६१ | उरी ······ | उणें· कमी· |
| ६२ | उमजू ······ | समज समजू· |
| ६३ | उत्संरवळता | विपरीतपणा· |
| ६४ | उपप्लुव ···· | नाश· |
| ६५ | उठी ······ | उठे· |
| ६६ | उदान ······ | कंठस्थ (मानेंतील) वायु· |
| ६७ | उदार ······ | उठणें· दान करण्या विषयीं तत्पर· |
| ६८ | उकलणें ····· | स्पष्ट करणें· उघड करणें· |
| ६९ | उपज ······ | जन्म· |
| | ए· | |
| ७० | एवं ······ | त्याप्रकारें· |

| अ· नं· | शब्द· | अर्थ· |
|---|---|---|
| | ए· | |
| ७१ | एकदेशी | एकाड· हेकाड. एकादेशाचें |
| | क· | |
| ७२ | कथन ······ | सांगणें· |
| ७३ | कवण ······ | कोण· |
| ७४ | कडसणि ···· | अडचण· |
| ७५ | कर ······ | हात· |
| ७६ | कल्पुंराहिली | कल्पना करतां नादापावली· |
| ७७ | करणीय अकरणीय ······ | करणें· नकरणें· |
| ७८ | काम्य ······ | इच्छापूर्वक· |
| ७९ | काष्ठिं ······ | लाकडाच्या ठायीं· |
| ८० | कार्य ······ | स्थूळ सूक्ष्म· |
| ८१ | कारण ······ | सुषुप्ति निद्रा झोंप· |

| अ. नं. | शब्द. | अर्थ. |
|---|---|---|
| ८२ | कारण | महाकारण. |
| ८३ | काहाणी | गोष्ट. कथा. |
| ८४ | किजे | करावें. |
| ८५ | किट | मळ. |
| ८६ | किटक | भ्रमरी. कुंभारी. |
| ८७ | कुंर्वंडी | ओंवाळणी. |
| ८८ | केशी | केसी कोणत्या प्रकारें. |
| ८९ | केविं | कसें. |
| ९० | कैवल्य | अर्हेत ब्रम्ह. मोक्षपद. |
| ९१ | कैंची | कुठली. |
| ९२ | कै | कसा. |
| ९३ | कोंदण | आधार. |
| ९४ | कोंदाटलें | दाटलें. पूर्ण भरलें. |
| ९५ | कोडी | कोटी. |
| | **ख.** | |
| ९६ | खेवा | आपल्या ठिकाणीं. |

| अ. नं. | शब्द. | अर्थ. |
|---|---|---|
| | **ख.** | |
| ९७ | खोली | ओंडी. घराचा एक मर्यादित भाग. |
| | **ग.** | |
| ९८ | गमन | जाणें. |
| ९९ | गड्द | दाट. |
| १०० | गगनपाहीं | गगना (आभाळा सारखें पहा.) |
| १०१ | गम्य | पावणें. माहिती. |
| १०२ | गणपति | गजानन मूळआराध्य दैवत. |
| १०३ | ग्रास | नाशकरणें. खाणें - घांस. |
| १०४ | गुदीं | मळद्वारांत. |
| १०५ | गुरुगम्य | गुरु कृपेंकरून प्राप्त होणारें. |
| १०६ | गुज | गुह्य. एकांतिक. |

| अ. नं. | शब्द. | अर्थ. |
|---|---|---|
| १०७ | गुडाकेश | अर्जुन. पार्थ. एक पांडव. |
| १०८ | गोंवा | संशय. गुंता. |
| १०९ | गोडी | गोडी. प्रीति. |
| ११० | गंध | वास. |
| | **घ.** | |
| १११ | घृत | तूप. एक पौष्टीक पदार्थ. |
| ११२ | घ्राण | नासिकास्थान. नाक. |
| | **च.** | |
| ११३ | चराचर | जंगम. स्थावर. जाणारें न जाणारें. |
| ११४ | चतुष्टयाचा | चार देहाचा. |
| ११५ | चांग | चांगला. |
| ११६ | चारवे | चारवा. चवथ्या. |
| ११७ | चिदाभास | जीव. |
| ११८ | चिदाकाश | ज्ञानरूप आकाश. |

| अ. नं. | शब्द. | अर्थ. |
|---|---|---|
| ११९ | चिद्रूपाशीं | ज्ञानरूपाशी. |
| १२० | चिदादित्य | ज्ञानसूर्य. |
| १२१ | चैतन्य | ज्ञान. जीवकला. |
| १२२ | चक्री | विष्णु. |
| | **ज.** | |
| १२३ | जंव | जेव्हां. |
| १२४ | जाणीव | जाणणें, जाणपेंपणा. समजणें. |
| १२५ | जायते | जन्मास येतें. उत्पन्न होणें. |
| १२६ | जिव्हाळा | वर्धक, कळवळा. |
| १२७ | जिरवून | शांत करून. पचवून. |
| १२८ | जीवन्मुक्त | लोकांस जीवंत दिसत असून स्वतः जीवित्वापासून मुक्त. |
| १२९ | जिव्हा | जीभ. रसना. |

| | | |
|---|---|---|
| १३० | जिव्हार | आश्रय, आधार. |
| १३१ | जागपणें | जागेपणानें. |
| | **ठ.** | |
| १३२ | ठाके | उभीराही. |
| | **ड.** | |
| १३३ | डोळां | दृष्टीस, नजरेस. |
| | **त.** | |
| १३४ | तव | तेव्हां. |
| १३५ | त्वंपद | जीवपद. |
| १३६ | तम | अंधार. काळोख. राग. |
| १३७ | तत्पद | ईश्वर (तुझें) पद. |
| १३८ | त्वचा | कातडी. |
| १३९ | तृषा | तहान. |
| १४० | तरंग | विशेषभास. |
| १४१ | त्यजिलें | टाकून दिलें. |
| १४२ | त्यागबुद्धि. | टाकण्याच्या इच्छेनें. |
| १४३ | तया | त्याला. |
| १४४ | तद्रूप | त्याच्यारूपाप्रमाणें. |
| १४५ | तादात्म्य | ऐक्य. एकसारखें. |
| १४६ | तियेनें | तिनें. |
| १४७ | तिलक | मुख्य. टिळा. |
| १४८ | तुझिये | तुझ्या. |
| १४९ | तूर्य | ज्ञानरूप. |
| १५० | तेंवि | त्याप्रमाणें. |
| १५१ | तैजसु | तेजस्वी: हिरण्यगर्भ (सोनें) |
| १५२ | तैं | तेव्हां. |
| | **द.** | |
| १५३ | द्रष्टा | पहाणारा. |
| १५४ | द्रष्ट | पाहिलेलें. |
| १५५ | दृश्यमात्रीं | भासणाऱ्यासर्वपदार्थांच्याठायीं. |
| १५६ | द्रष्टत्व | पहाणेंपणा. |

| अ. नं. | शब्द. | अर्थ. |
|---|---|---|
| १५७ | हूंदातिल | हुंदे तातित. |
| १५८ | दाता | देणारा. |
| १५९ | दावित | दाखवित. |
| १६० | दाह | आग. |
| १६१ | दीप्ति. | प्रकाश, दिवली. |
| १६२ | दीपन | प्रकाशन, उजेड पडणें |
| १६३ | दुमदुमित | गुटगुटीत, लठ्ठ. |
| १६४ | देखी. | पाहून करण्याची रीत. |
| १६५ | देंटींहूनि | देंटापासून. |
| | **ध.** | |
| १६६ | धव | पति. नवरा. |
| १६७ | धाम | घर. |
| १६८ | धारणा | ध्यान करण्याची रीत. |
| १६९ | ध्याति | ध्यान (आराधना) करिती |
| १७० | ध्याइजे | ध्यान (स्तवन) कर. |

| अ. नं. | शब्द. | अर्थ. |
|---|---|---|
| | **न.** | |
| १७१ | नव्हे | करतां येत नाहीं. |
| १७२ | नर | पुरुष. |
| १७३ | नयन | डोळे, नेत्र. |
| १७४ | नाथ | नवरा. |
| १७५ | नायकावी | ऐकूं नये. |
| १७६ | नाडी | धमनी. सुशीर. फुंकणी. |
| १७७ | नारी | स्त्री. |
| १७८ | नाठव | न आठवणें. |
| १७९ | नाथिलाची | उगाच. व्यर्थ. |
| १८० | नास्तिक्यपावे | नाहिंसे होती. |
| १८१ | नाथिलें | खोटें, मिथ्या. |
| १८२ | नातळे | दोषी होत नाहीं. |
| १८३ | नादळे | आदळत नाहीं. |
| १८४ | निर्वाण | शेवटलें. |

| | | |
|---|---|---|
| १८५ | निजध्यास | अनुसंधानघोष. |
| १८६ | निर्वाणी | एक. |
| १८७ | निरोधन | अवरोध(प्रतिबंध)करणें |
| १८८ | निके | खरे. |
| १८९ | नि | सर्वस्वी शेष. |
| १९० | निरालंब | निराश्रित.स्वतंत्र. |
| १९१ | निर्लेप | निर्दोष. दोष नाहीं. |
| १९२ | निरक्षी | पाही. |
| १९३ | निधान | ठेव,खजिना,रान. |
| १९४ | निर्धार | निश्चय. |
| १९५ | निवृत्ति | नाश. शांती. |
| १९६ | निगुति | निश्चयानें. नुकताच. |
| १९७ | निरसणें | नाश होणें. |
| १९८ | निज | आपला. |
| १९९ | निशि | रात्र. |
| २०० | निरामय | निर्दोष. |
| २०१ | निमिषांत | क्षणांत.अल्पकाळांत. |
| २०२ | निषेध | शास्त्रानें करूंनको म्हणून सांगितलेलें. |
| २०३ | निर्वाहकु | निर्वाह पोटभरणें. |
| २०४ | निष्टंक | प्रत्यक्ष. |
| २०५ | निरंजन | दोष नाहीं असा. |
| २०६ | नुरे | उरत नाहीं. |
| २०७ | नुमजणें | नजाणणें. |
| २०८ | नेदी | देत नाहींत. |
| २०९ | नेणकरी | नजाणणारा. |
| २१० | नेटें वाटें | उघड रीतीनें. |
| | **प.** | |
| २११ | परम | उत्कृष्ट. |
| २१२ | पट | वस्त्र चिरगुट. |
| २१३ | पदातित | पायाच्या पलीकडला पायदळ. |

| अ. नं. | शब्द. | अर्थ. |
|---|---|---|
| २१४ | प्रसरण | वाढणें. |
| २१५ | प्रकट | प्रकाशित. उघड. |
| २१६ | परोक्ष | प्रत्यक्ष, समक्ष. |
| २१७ | प्रतिष्ट | स्थिति. स्तुति. |
| २१८ | परात्पर | दुसऱ्याच्यापलीकडला. |
| २१९ | परियेसा | ऐका. |
| २२० | परिमळ | सुगंध, वास. |
| २२१ | प्रकाशसी | प्रकाशतोस. |
| २२२ | प्रवर्तते | कल्पनारूप व्यवहार करण्याला आरंभ करिते. |
| २२३ | प्रत्यगात्मा | सर्वांहून पलीकडला आत्मा. |
| २२४ | प्रत्ययाचें | अनुभवाचें. |
| २२५ | पर | पलीकडला दुसरा. |
| २२६ | परि | रीती. |
| २२७ | प्रत्यगावृत्ति. | अंतर मुखता. वारंवार. |
| २२८ | प्रळयनीर | पृथ्वी बुडण्याच्या वेळचें पाणी. |
| २२९ | प्रतिती | अनुभव. |
| २३० | परिहारू | उदाहरण. |
| २३१ | परवंडी | मार्ग. |
| २३२ | पदांबुज | पदकमळ. |
| २३३ | पहुडे | निजे, पडे, चढे. |
| २३४ | प्रतिपत्ति | प्राप्ति. |
| २३५ | पद्मा | लक्ष्मी. |
| २३६ | प्राप्ति | मिळकत. |
| २३७ | प्राज्ञ | ज्ञाता. शहाणा. |
| २३८ | पाखांड | असत्य. विपरीत. |
| २३९ | पालव | पदर. मालव. |
| २४० | प्राण | वरती जाणारा वायु. |

| | | |
|---|---|---|
| २४१ | पारखेपण | परीक्षा करणें. |
| २४२ | प्राज्ञ | अधिक मूर्ख. |
| २४३ | पासाव | पासून. |
| २४४ | पान | ऐकणें, पिणें. |
| २४५ | पाहेंपां | पहा, पहा |
| २४६ | पिसें | वेड, लाज. |
| २४७ | पैलथडी | पलीकडील बाजूस. |
| २४८ | पैस | पसरलेला दूर. |
| | **फ.** | |
| २४९ | फावे | सांपडे. |
| २५० | फळापेक्षा | फळाची इच्छा. |
| | **ब.** | |
| २५१ | बुजुनियां | जाणुनियां नाहिंसें होऊनि |
| २५२ | बुद्ध | ज्ञानरूप. |
| २५३ | बुजे | समजे. |
| | **भ.** | |
| २५४ | भरींव | दाट, पोंकळ नव्हे तें. |
| २५५ | भवभय | संसाराची भीति. |

| | | |
|---|---|---|
| २५६ | भासु | भास. |
| २५७ | भाविजे | म्हणावें. |
| २५८ | भागी | वांटेकरी, हिस्सा. |
| २५९ | भाविती | करिती. भक्ति करिती. |
| २६० | भुली | भ्रम भ्रांति. |
| २६१ | भूतीं | सर्व वस्तूंच्या ठिकाणीं. |
| २६२ | भेद | भेद (प्रकार) भाव. |
| २६३ | भंगतात | नाश होतात. |
| | **म.** | |
| २६४ | मथुनि | घुसळुनि. |
| २६५ | महाकारण | सर्वांचे कारण. मोठें कारण. |
| २६६ | महत् | मोठें. |
| २६७ | मठी | झोंपडी, घर. |
| २६८ | मज्जा | सप्त धातु पैकीं एक धातु कुपाळांतील मगज. |
| २६९ | मृगजळ | खोटें-पाणीं. |
| २७० | मनोवृत्तिजय | मनोवृत्ति ज्यातें. |

| | व. | |
|---|---|---|
| ३०० | व्यक्ति ..... | मनुष्याची प्रत्येक मूर्ति. |
| ३०१ | वृत्ति ..... | कल्पना. |
| ३०२ | वसे ..... | राही. |
| ३०३ | वृथा ..... | व्यर्थ. फुकट. |
| ३०४ | वरद ..... | वर देणारा. |
| ३०५ | वाच्यपक्ष ..... | लौकिकार्थ. |
| ३०६ | वार्द्धक्य ..... | क्षय पावणें. |
| ३०७ | व्यापणें ..... | पीडणें. गुंडाळणें. |
| ३०८ | व्यान ..... | वेंर्धान्च्या ठिकाणीं रहाणारा वायू. |
| ३०९ | वावरे ..... | व्यवहार करते. |
| ३१० | वाहे ..... | वहातो. |
| ३११ | वायां ..... | फुकट. |
| ३१२ | वाहसी ..... | धरसी. वहातोस. |
| ३१३ | वाचा ..... | वाणी. |
| ३१४ | विकटविघ्नराजेंद्र. | धूम्रवर्ण शंकर. |
| ३१५ | विद्याधिन् ..... | विद्वान्. |
| ३१६ | विवळणें ..... | समजणें. |
| ३१७ | विरहित ..... | निराळा, शिवाय. नाहीं. |
| ३१८ | वीण ..... | शिवाय. |
| ३१९ | विवर्धन ..... | वृद्धी. |
| ३२० | विपरीत मति | परिणाम पावते. वाईट बुद्धि. |
| ३२१ | विनोद ..... | आल्हादकारक कृती. |
| ३२२ | विजातिय | उलटजातीचें. चमत्कारीक |
| ३२३ | विश्वाचा ..... | जागृत अवस्थेच्या अभिमानी जीवाचा. |
| ३२४ | विसर्ग ..... | टाकणें. |
| ३२५ | विलक्षण ..... | निराळा चमत्कारीक. |
| ३२६ | विध ..... | भेद. प्रकाश. |
| ३२७ | विराला ..... | नाश पावला. |
| ३२८ | विज्ञान ..... | अनुभवज्ञान. |
| ३२९ | विषयाची ..... | सर्वपदार्थांची. |
| ३३० | विरक्ति ..... | वैराग्य. |

| अ. नं. | शब्द. | अर्थ. |
|---|---|---|
| २७१ | माप ···· | गणना, मोजणें. |
| २७२ | मात ···· | गम्मत, गोष्ट. |
| २७३ | मांडे ···· | मांडती. आरंभ होती. |
| २७४ | माजि ···· | मध्यें. आंत. |
| २७५ | मिळणी ···· | ऐक्य. एकी. |
| २७६ | मिथ्या ···· | खोटें. |
| २७७ | मुरणें ···· | शांत होणें. जिरणें. |
| २७८ | मेळें ···· | मिळाल्यानें. |
| २७९ | मोक्ष ···· | मुक्ति. |
| २८० | मंथन ···· | मथित. तात्पर्य. सार. |
| | **य.** | |
| २८१ | एकवटी ···· | एकत्र कर. |
| २८२ | येरतें ···· | द्वैत. दुसरें. |
| | **र.** | |
| २८३ | रति ···· | स्त्री समागम सुख. |
| २८४ | रहस्य ···· | गोप्य. प्रीति. |
| २८५ | रातलें ···· | रमलें. |
| २८६ | राणिव ···· | राज्य. |
| २८७ | राहटी ···· | जाणें. स्थिति. |
| २८८ | रिघावें ···· | जावें. |
| २८९ | रेत ···· | धातु. शक्तिवाचकपदार्थ. |
| २९० | रोम ···· | केश. |
| २९१ | रंक ···· | भिकारी. |
| | **ल.** | |
| २९२ | लक्ष्य ···· | खरा अर्थ. मन. |
| २९३ | लय ···· | नाहिंसें होणें. |
| २९४ | लळ ···· | होसी. |
| २९५ | लाहिजे ···· | पाहिजे. |
| २९६ | लाधे ···· | प्राप्त होई. |
| २९७ | लिंगदेह ···· | सूक्ष्मदेह. |
| २९८ | लिळा ···· | करणी. वर्त्तणूक. |
| २९९ | लोपलें ···· | नाहींसें झालें. |

| अ. नं. | शब्द. | अर्थ. |
|---|---|---|
| ३३१ | विवेकें | विचारानें. |
| ३३२ | विदारी | विचारकर. शोधकर. छिन्नभिन्न करी. |
| ३३३ | विरे | मुरे. जिरे. नाहींसा होई |
| ३३४ | विरमे | शांत होई. |
| ३३५ | वितळे | पातळ होई. |
| ३३६ | विधि | शास्त्रांत सांगितलेला प्रकार, ब्रह्मदेव. |
| ३३७ | विसंगे | विसरे. |
| ३३८ | वेदांत | उपनिषध-भाग-ईश्वर ओळखण्याचें ज्ञान. |
| ३३९ | वासनामय | इच्छारूप. |
| ३४० | वेगळाकीं | निराळाच. |
| ३४१ | वेद्य | जाणण्यास योग्य. |
| ३४२ | वैश्वानर | अग्नि. विस्तव. |
| ३४३ | वोल्हावा | विव्हाळा. |
| | **श.** | |
| ३४४ | शबल | दोषयुक्त. |
| ३४५ | श्रवण | कान. ऐकणें. |
| ३४६ | शिश्न | नराचें चिन्ह लिंग. |
| ३४७ | श्रू | वेद. |
| ३४८ | श्रुत | ऐकलेलें. |
| ३४९ | शून्य | नाहिंसें. |
| ३५० | शुद्ध | पवित्र निर्मळ. |
| ३५१ | शोणित | रक्त. |
| | **ष.** | |
| ३५२ | षडानन | कार्तीकस्वामी. |
| | **स.** | |
| ३५३ | सद्गुरु | चांगला मोक्ष देणारा गुरु. |
| ३५४ | स्वयंप्रकाश | स्वतांचें तेज. |
| ३५५ | स्वयंभरित | स्वतः भरलेला पूर्ण. |
| ३५६ | सदोदित | निरंतर. सदा उघड. |
| ३५७ | सम्यक | योग्य. चांगलें. |

पर- वेदांतसिद्धांत॥ जेकांबोलतीपाखंडमत॥ त्यांचीनायकावीमात प्र-
३ महावाक्यार्थअनुभविजे॥ १६॥ वेदबोलिलासृष्टिक्रम॥ तोसां २
डूनिसकळधर्म॥ वेदांताचेंनिजवर्म॥ लाहिजेगुरुमुखें॥ १७॥
वेदांताचेंअबोलणें॥ सिद्धांतीचेंजाणोनिनेणणें॥ जेथेंमिळणीहो
यतेंपावणें॥ कैवल्यपद॥ १८॥ जीवेश्वराचीमिळणी॥ होयपरम
पदनिर्वाणी॥ तेथेंद्वैतबुद्धीचीकडसणी॥ तुटोनिजाय॥ १९॥ ॥

इतिश्रीपरमामृतमुकुंदराजविरचितअन्यमतखंडणनामद्विती
यप्रकरणंसंपूर्णम्॥ २॥ ॥ छ॥ ॥ छ॥ ॥ छ॥

श्रीगुरुभ्योनमः॥ करूनिआदिशक्तिचाअंगिकारू॥ जोकरी
उत्पत्तिस्थितीसंहारू॥ सर्वसाक्षीसर्वेश्वरू॥ तोशबलबोलिजे॥ ३
१॥ स्थूळदृष्टीचेंजाणणें॥ तितुकेंहिनिरसणें॥ उरेअदृश्यजोद्रष्टे

पणें॥ तोचि शुद्धपरमात्मा॥ २॥ सर्वज्ञआणिसर्वेश्वरू॥ ऐसा स
कळशास्त्रांचानिर्धारू॥ तोचिजाणिजेपरात्परू॥ ज्ञप्तिमात्र॥ ३
अनंतशक्तींचाद्रष्टा॥ स्थानमानविरहितप्रतिष्ठा॥ जयाअपरमि
तघनदाटा॥ पारनेणिजे॥ ४॥ नयाबोलिजे शुद्ध॥ निरसिजेश
बलत्वअशुद्ध॥ ज्ञानघनानंदसिद्ध॥ परमेश्वर॥ ५॥ ब्रह्मांडहि
रण्यगर्भमाया॥ जोवेगळायादेहत्रया॥ मूळप्रकृतीमहामाया
यांविलक्षणजो॥ ६॥ उत्पत्तीस्थितीसंहार॥ सर्वसाक्षित्वाचाव्य
वहार॥ याअवस्थातीतअपार॥ आपेआपजो॥ ७॥ ब्रह्माविष्णू
रुद्र॥ आणिचौथाहासर्वेश्वर॥ याचेगळाअपरंपार॥ शुद्ध
ब्रह्मजो॥ ८॥ याचिपरीपाहतां॥ जीवअविद्याविरहिता॥ का
म्यकर्मातीता॥ जाणिजेऐसा॥ ९॥ स्थूळसूक्ष्मकारण॥ चौथा
देहमहाकारण॥ जागृतिस्वप्नसुषुप्तीजाण॥ तुरियाचौथी॥ १०

११॥ तूं देहकीं देहाचा जाण॥ देह तुज जाणे कीं तुज याचें ज्ञान॥ पाहतां द्रष्टा तूं आपण॥ देह तुज दृश्य॥ १२॥ देहास बाह्य अभ्यंतरीं॥ तूं जाणशी गा विचारी॥ देह अलंकाराचे परी॥ मिरविशी तूं॥ १३॥ ठेवोनि रवोळी पंचभूतांची॥ भूतीं निरविशी तूंची॥ जाणीव असे कीं याची॥ तुजचि कीं॥ १४॥ ऐसे आपणिया जाण॥ निरसीं हा दृश्य गुण॥ जे देह मी ह्मणतां सि आपण॥ नेसांडी भ्रांती॥ १५॥ देहाचिया अवयवां समस्तां॥ तूंचि एक जाणता॥ तो तुझा तूं आइता विचारूनि पाहीं॥ १६॥ रोम त्वचा नाडी मांस॥ आस्थि हे पंच अंश॥ कठिण हा धरणीचा भास॥ जाणसी तूं॥ १७॥ लाळ मूत्र शोणित॥ मज्जा रेत हें आपद्रवत॥ या पांचा अंशांतें निश्चित॥ जाणता तूं एक॥ १८॥ क्षुधा तृषा आळस निद्रा॥ मैथुन हें अंश वैश्वानरा॥ या पांचांचिया व्यवहारा॥ जाणशी तूं॥ १९॥ चलन धावन निरोधन॥ प्रसर

पर अखंडिता ।। माजीपडिजे ।। ३ ।। जेथेंनाहींमायाअविद्या ।। जेअप प्र
५ रिमितस्वसंवेद्या ।। तेंसांगोंब्रह्मविद्या ।। सावधानपरियेसा ।। ४ ।। जे ४
घनानंदसुखाचीराशी ।। प्रवेशोनितयेस्वप्रकाशीं ।। असिजेगमना
गमनाशीं ।। नासोनिसदा ।। ५ ।। तेंसाधावेंकवणेरीती ।। जेणेंहोय
नित्यतृप्ती ।। तेयुक्तिऐकावीसुनिश्चिती ।। एकाग्रहोउनी ।। ६ ।।
परिआधीसांगोंसाधन ।। आत्मस्वरूपाचेंपरिज्ञान ।। तेंजाणितल्या
विण ।। कायध्यावें ।। ७ ।। आधिआत्मयातेंजाणावें ।। मगतयातेंसा
धावें ।। येरवींनुसतेंअनुभवावें ।। कायधरुनी ।। ८ ।। ज्यायुक्तिस्व
रूपएक ।। जाणणेंतेंबुद्धिएक ।। मीआहेंहेंतवनिष्टंक ।। जाणसीतूं ।।
९ ।। असेंतवजाणसी ।। परिमीकोणहेंनेणसी ।। तरीकांआपआप
पांसी ।। बुझेसिना ।। १० ।। तूंकोणकोठूनिकैंचा ।। आलागेलासि ५
तरीसाचा ।। परिपालवनधरिसीविचाराचा ।। आपणाजाणावया ।।